
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १८७
www.ramprahar.com
# राम प्रहर
बुधवार, २२ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

माध्यम क्षेत्रातही मोठे बदल -उपमुख्यमंत्री पवार/२
नवी मुंबईतून महिनाभरात ११८ बांगलादेशींना अटक/६
एसकेपीएलमध्ये पोलादपूर पोलीस संघ विजेता/८

## तुर्कीतील हॉटेलला भीषण आग; ६६ जणांचा मृत्यू, ५१ जखमी



**अंकारा :** उत्तर तुर्कस्तानमध्ये एका स्की रिसॉर्ट हॉटेलला मंगळवारी (दि. २१) पहाटे लागलेल्या आगीत किमान ६६ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत ५१ जण जखमीदेखील झाले आहेत. खोलीतील हवामान गरम करण्यासाठी असलेल्या प्रणालीमुळे ही आग लागल्याचे सांगितले जात आहे. आग लागल्याचे समजताच हॉटेलमध्ये असलेल्या पर्यटकांनी खिडक्या, गॅलरीतून चादरींची दोरी करून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. अनेकांनी आगीमुळे खाली उड्या मारल्या. यामुळे त्यांचा पडून मृत्यू झाला. तुर्कीचे अंतर्गत विभागाचे मंत्री अली येरलीकाया यांनी, आम्ही अत्यंत दुखात आहोत. या हॉटेलला लागलेल्या आगीत दुर्दैवाने आम्ही ६६ जीव गमावले आहेत, अशी प्रतिक्रिया दिली.

# सामान्य जनतेचे प्रश्न मार्गी लावणार

## मंत्री गणेश नाईक यांचे प्रतिपादन; विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये





**चौक : प्रतिनिधी**

राज्यातील जनतेला महायुतीचे सरकार कार्यक्षम काम करणार याची खात्री असल्याने कधीही, कुणाला न मिळालेले यश हे जनतेने विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या पारड्यात दिले. त्यामुळे केवळ मंत्रालयात न बसता जनता दरबार भरवून सामान्यांशी संवाद साधला जाईल आणि त्यांचे प्रश्न मार्गी लावू, असे प्रतिपादन वनमंत्री गणेश नाईक यांनी केले.

राज्याचे वनमंत्री म्हणून गणेश नाईक आणि भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल चौक येथील कर्जत फाटा मैदानात सोमवारी (दि. २०) भाजपच्या वतीने त्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सत्काराला उत्तर देताना मंत्री नाईक बोलत होते. या वेळी विविध पक्षांचे पदाधिकारी, आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य व शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत ना. नाईक आणि प्रदेश कार्यकारी अध्यक्ष चव्हाण यांनी केले. विकासकामे अधिक जोमाने करू, सर्वांना न्याय मिळेल, असे ते म्हणाले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी दोन्ही सत्कारमूर्तींच्या कार्याचा गौरव केला तसेच आमदार महेश बालदी यांचा विकासपुरूष म्हणून उल्लेख करून त्यांच्या कार्याचीही प्रशंसा केली, तर आमदार महेश बालदी यांनी उरण विधानसभा मतदारसंघातील विकासकामांसाठी आपण कटिबद्ध असून व्यक्तिगत कामापेक्षा सार्वजनिक कामांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. (पान २ वर..)

### राज्यासह देश प्रगती करतोय -कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य आणि देश विकासाच्या वाटेवर आहे. या दोघांच्या कार्यशैलीने राज्यासह देश प्रगती करीत आहे. अशा वेळी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचण्यासाठी आणि तळागाळातील लोकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम जोमाने सुरू असल्याचे भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आपल्या भाषणात सांगितले.

## चरी येथे शेतकरी संपाचे भव्य स्मारक उभारणार

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची माहिती



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चरी येथे शेतकऱ्यांनी संप केला होता. त्याचे स्मारक उभारण्यात येणार आहे, परंतु जमीन उपलब्ध न झाल्यामुळे हे स्मारक रखडले. या स्मारकासाठी एमएमआरडीएची जागा घेऊन तेथे भव्य स्मारक उभारणार, अशी माहिती केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरणमंत्री रामदास आठवले यांनी दिली.

शेतकऱ्यांनी संप केला होता, त्या चरी गावाला ना. आठवले यांनी मंगळवारी (दि. २१) भेट दिली. तेथील लोकांशी चर्चा केली. त्यानंतर ते अलिबाग येथे पत्रकारांशी बोलत होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या गावांमध्ये गेले होते तेथे स्मारक उभारण्याची राज्य शासनाची योजना होती. अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांनी खोतीविरोधात सहा वर्षे संप केला. या शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी डॉ. आंबेडकर चरी येथे आले होते. त्यामुळे चरी येथे स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांनी चरी गावाला भेट दिली. येथे उभारण्यात येणाऱ्या स्मारकासाठी एक कोटी रुपये मंजूर केले, पण पुरेशी जागा न मिळाल्यामुळे हे स्मारक रखडले, असे ना. आठवले यांनी सांगितले. (पान २ वर..)

## ज्येष्ठ कीर्तनकार किसन महाराज साखरे यांचे निधन



**पुणे, आळंदी : प्रतिनिधी**

संतसाहित्याचे गाढे अभ्यासक आणि राज्य सरकारच्या ज्ञानोबा तुकोबा पुरस्काराचे मानकरी, ज्येष्ठ कीर्तनकार किसन महाराज साखरे (वय ८९) यांचे हृदयविकाराने पुण्यातील चिंचवड येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आळंदीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

किसन महाराज यांना बालवयातच संतसाहित्याच्या अध्ययनाचे संस्कार लाभले. १९६० साली साधकाश्रमाची धुरा त्यांच्या हाती आल्यापासून साधकाश्रमात ज्ञानार्जनासाठी आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना महाराजांनी संतसाहित्य व तत्त्वज्ञानाचे शिक्षण दिले. कीर्तन, प्रवचनाद्वारे महाराष्ट्राच्या खेडोपाड्यातून त्यांनी आध्यात्मिक उद्बोधन केले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

## छत्तीसगडमध्ये १४ नक्षलवाद्यांचा खात्मा

**रायपूर : वृत्तसंस्था**

छत्तीसगडमध्ये कुल्हाडीघाटच्या भालुदिघी टेकड्यांवर झालेल्या चकमकीत १४ नक्षलवाद्यांना सुरक्षा दलाने कंठस्नान घातले. तेथून शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.

या चकमकीत ओडिशा राज्य नक्षलवादी प्रमुख जयराम उर्फ चलपती याचाही खात्मा केल्याचे सांगण्यात येते. त्याच्यावर एक कोटी रुपयांचे बक्षीस होते.

## दिशा समितीची आढावा बैठक; लोकप्रतिनिधींची उपस्थिती



**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा विकास समन्वयक व सनियंत्रण (दिशा) समितीची बैठक खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली व खासदार सुनील तटकरे यांच्या सहअध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २१) नियोजन समिती सभागृहात झाली. या बैठकीला लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्र शासनामार्फत लोककल्याणाच्या योजना राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थ्यांना १०० टक्के लाभ मिळेल यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष रहावे, असे निर्देश खासदार श्रीरंग बारणे यांनी दिले; तर केंद्र शासनाच्या योजना राबविताना जाणीवपूर्वक दिरंगाई करणाऱ्या सर्व घटकावर कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना खासदार सुनील तटकरे यांनी दिल्या.

बैठकीला खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर व रविशेठ पाटील, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, उपवनसंरक्षक राहुल पाटील, अप्पासाहेब निकत, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सत्यजित बडे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. (पान २ वर..)



**पनवेल : शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये सीकेटी विद्यालयाची विद्यार्थिनी श्रावणी अमर थळे इयत्ता दहावीत ९८.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात पहिली, तर रायगड जिल्ह्यात दुसरी आली. जिल्हा परिषद शिक्षण विभागातर्फे श्रावणीला अलिबाग येथे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्रावणीचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. या वेळी सीकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण व पर्यवेक्षिका ए.एल. नीरजा उपस्थित होते.** **(वृत्त पान ३ वर..)**

## गेट वे ते जेएनपीए ई-वॉटर टॅक्सीसेवा

### पुढील महिन्यापासून वाहतुकीसाठी नवा पर्याय



**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील पहिली इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी मुंबईत धावणार आहे. गेट वे ऑफ इंडिया ते उरण जेएनपीएदरम्यान ही टॅक्सी सेवा चालवण्यात येणार आहे. जेएनपीए कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी ही सेवा लाभदायी ठरणार आहे.

माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेड (एमडीएल) आणि जेएनपीए यांच्यातील करारानंतर ही सेवा पुढील महिन्यापासून नियमितपणे सुरू केली जाणार आहे. हा एक नवीन वाहतूक पर्याय असणार आहे, जो मुंबईतील वाढती वाहतूक समस्या सोडवण्यास मदत करू शकेल. जलमार्गांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल म्हटले जात आहे.

मुंबई महानगर क्षेत्रात वाहतूक कोंडीची समस्या मोठी आहे. त्यावर उपाय म्हणून जलमार्गाला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी यापूर्वीही वॉटर टॅक्सी आणि रोपॅक्स फेरी सेवा सुरू करण्यात आली होती, मात्र पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमती आणि पर्यायाने महागड्या तिकीट दरांमुळे या सेवांना नागरिकांनी प्रतिसाद दिला नाही. याच पार्श्वभूमीवर आता इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीची सेवा समोर आली आहे. ही सेवा किफायतशीर आणि पर्यावरणासाठी फायदेशीरदेखील ठरणार आहे.

सुरुवातीला ही इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी परदेशातून आणण्याचा विचार होता, पण माझगाव डॉक शिपबिल्डिंग लि. (एमडीए)ने स्वतःच इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी तयार करण्याचा निर्णय घेतला तसेच इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीची निर्मितीही यशस्वी पूर्ण केली आहे. दरम्यान, एमडीएलने दोन इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी तयार केल्या आहेत. त्यामुळे मुंबईकरांसाठी वाहतुकीचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे.

### अशी आहेत वैशिष्ट्ये

या इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीची लांबी १३.२७ मीटर, तर रुंदी ३.०५ मीटर आहे. वॉटर टॅक्सीची आसन क्षमता २५ प्रवाशांची आहे तसेच यामध्ये ६४ किलोवॅटची बॅटरी आहे. ही ई-वॉटर टॅक्सी एकदा चार्जिंग केल्यावर चार तास चालू शकते. टॅक्सीचा वेग १४ नॉट्सपर्यंत असणार आहे. याशिवाय यात वातानुकूलित सुविधा उपलब्ध असणार आहेत, ज्यामुळे प्रवाशांना आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल.



# माध्यम क्षेत्रातही मोठे बदल -उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई: प्रतिनिधी**

माध्यम क्षेत्रातही मोठे बदल होत असतांना एखाद्या घटनेची वस्तुनिष्ठता तपासूनच माध्यमांनी बातमी द्यावी. बातमीला सनसनाटी स्वरुप देणे माध्यमांनी टाळावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२३ व सन २०२४ च्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते मंत्रालयातील समिती सभागृहात झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे, माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, उपाध्यक्ष महेश पवार, सरचिटणीस प्रवीण पुरो, खजिनदार विनोद यादव आदी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात ज्या पत्रकारांनी, निर्भिड पत्रकारिता केली. पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला. त्यांचा वारसा, परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न करावा. सध्या तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे माध्यम क्षेत्रातही मोठे बदल झाले आहेत. आता इलेक्ट्रॉनिक मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म्स, आणि सोशल मीडियाने माध्यमांचे रूप पालटले आहे.

आज बातम्या केवळ वृत्तपत्रांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. मोबाइलवर, सोशल मीडियावर काही सेकंदांत बातम्या पोहोचतात. माध्यमांचा वेग झपाट्याने वाढला आहे. त्यातच आता माध्यम क्षेत्रातही कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू झाला असून या क्षेत्रावर 'एआय'चा मोठा प्रभाव पडणार आहे. 'एआय' आपल्याला सहाय्यक ठरू शकतो, मात्र पत्रकारितेच्या मुळाशी असलेली सत्य, पारदर्शकता, आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये केवळ पत्रकारच जपू शकतात, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

माध्यम क्षेत्रात बदल होत असताना मीडिया ट्रायल सारखी आव्हानेही समोर येत आहेत. 'मीडिया ट्रायल'मुळे समाजात संभ्रम निर्माण होतो आणि एखाद्या व्यक्तीचं जीवन उद्ध्वस्त होऊ शकते, एखाद्याचे करिअर संपू शकते. माध्यमांनी सत्य, पारदर्शकता आणि नैतिकतेला महत्त्व द्यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

चुकीच्या गोष्टीवर टीका करणे, टीपणी करणे हा माध्यमांचा हक्क आहे. सगळीकडे नकारात्मक गोष्टी घडताना चांगल्या, सकारात्मक गोष्टी सुद्धा समाजाच्या समोर येणे आवश्यक असल्याचे मतही पवार यांनी व्यक्त केले.

पत्रकारांच्या विविध मागण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मी स्वतः सकारात्मक आहोत. माध्यमकर्मीचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेसंदर्भात अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सध्याच्या पत्रकारितेपुढे मोठे आव्हाने निर्माण झाली आहेत. गंभीरपणे व प्रामाणिकपणे पत्रकारिता करणाऱ्यास मध्यवर्ती पत्रकारितेमध्ये स्थान राहिले नाही. मात्र, तरीही गंभीरपणे व प्रामाणिकपणे काम करणारे पत्रकार स्वतःची जागा निर्माण करत आहेत. पत्रकारांना समाजातील समस्या जाणून घेऊन त्याचे वार्तांकन करण्यासाठी माध्यम संस्थांनी पाठबळ देणे आवश्यक असल्याचे चोरमारे यांनी यावेळी सांगितले.

अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी शासनाने पत्रकारांचे विविध प्रश्न सोडवावे, अशी मागणी केली.

## कल्याण, भांडुप परिमंडळात ९,२५७ वीजचोरांवर कारवाई

**कल्याण : प्रतिनिधी**

महावितरणच्या कल्याण आणि भांडुप परिमंडलाने वीजचोरी विरोधात धडक कारवाई केली आहे. ९ महिन्यांत ९ हजार २५७ जणांविरुद्ध कारवाई करत महावितरणने ४६ कोटी ७८ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली आहे. वीजचोरीची देयके न भरणाऱ्या ९०६ ग्राहकांवर महावितरणतर्फे थेट पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर दोन्ही परिमंडलात ८८० जणांविरुद कारवाई करून ५ कोटी ७ लाख रुपयांचा अनधिकृत वीजवापर उघडकीस आणण्यात आला आहे.

भांडुप परिमंडलात नऊ महिन्यांच्या कालावधीत आकडे टाकून वीजचोरी करणाऱ्या ४१७ जणांवर कारवाई करून १ कोटी ९९ लाख रुपयांची वीजचोरी पकडण्यात आली. तर मीटरमध्ये फेरफार अथवा टॅपिंग करून विजेचा चोरटा वापर करणाऱ्या २ हजार २७३ जणांकडे १७ कोटी ७३ लाख रुपयांची वीजचोरी आढळून आली. याशिवाय ४७७ जणांविरुद्ध कारवाई करून २ कोटी ८४ लाख रुपयांचा विजेचा चोरटा वापर उघडकीस आणण्यात महावितरणच्या पथकांना यश आले. चोरीच्या विजेचे देयक व दंडाचा भरणा टाळणाऱ्या ८८ जणांविरुद्ध वीजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वीजचोरी हा सामाजिक आणि जबर शिक्षा व दंडाची तरतूद असलेला गंभीर फौजदारी गुन्हा आहे. या गुन्ह्यात तीन वर्षे कारावास किंवा दंड अथवा या दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. ही बाब लक्षात घेऊन कोणत्याही प्रकारे विजेचा चोरटा किंवा अनधिकृत वापर कटाक्षाने टाळावा. अधिकृत वीजजोडणी घेऊनच विजेचा वापर करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## जीवनातील आव्हाने परिस्थितीशी लढायला शिकवतात

### माजी पोलीस महासंचालक मीरा बोरवणकर यांचे मत

**अलिबाग : प्रतिनिधी**

आयुष्यात संकट येत नाहीत तर आव्हाने येतात, ही आव्हाने आपल्याला परिस्थितीशी लढायला शिकवतात. त्यामुळे आव्हानानी खचून न जाता त्यांना सामोरे जायला हवे असे मत राज्याच्या माजी पोलीस महासंचालक मीरा बोरवणकर यांनी व्यक्त केले. त्या विद्यासन एज्यूकेशनल ट्रस्टच्या वतीने आयोजित वेध अलिबाग २०२५ या कार्यक्रमात बोलत होत्या.

तरुणांनी करीअर निवडतांना आपली आवड कशात आहे हे लक्षात घेऊनच योग्य मार्ग निवडायला हवा. अन्यथा आपण या क्षेत्रात का आलो अशी खंत मनात राहून जाते असेही बोरवणकर यांनी यावेळी सांगितले. पदवीत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर घरच्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे मी आणि मोठ्या बहिणीने युपीएससी परीक्षआ दिली. पहिल्याच प्रयत्नात दोघी पास झालो. मी अकाऊंट्स सेवांचा पर्याय निवडला. मात्र वर्षभरातच मला या विषयात गती नसल्याचे लक्षात आले. त्यामुळे पुन्हा युपीएससीची परिक्षा दिली आणि त्यानंतर भारतीय पोलीस सेवेत प्रवेश केला. त्यामुळे नोकरीचे पर्याय निवडतांना आपली आवड आणि कल लक्षात घेणे आवश्यक असल्याचे बोरवणकर यांनी या वेळी सांगितले.

महिलांना करीअर आणि कुटूंब अशा दोन जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. पण एकाच वेळी दोन्ही जबाबदाऱ्या कशा पार पाडता येतील अशी भिती त्यांच्या मनात असते. पण या गोष्टीचा फार विचार करत बसण्याची गरज नाही. वेळ आली की मार्ग सापडतो. कुटूंबाची जबाबदारी दोघांना वाटून घेता येऊ शकते असे असा सल्ला युवकांना दिला. आयुष्यात सतत शिकत राहणे आणि स्वतःचे व्यक्तीमत्व विकसित करणे ही यशाची गुरूकिल्ली आहे. त्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करायला हवेत.

प्रशासकीय सेवेत काम करतांना अनेक चांगले वाईट अनुभव आले. मात्र या अनुभवातून बऱ्याच गोष्टी शिकता आल्या. नागरीकांचे सहकार्य प्रशासकांच्या पाठीशी असेल तर प्रशासकीय कामकाज सुरळीत आणि गतिमान पध्दतीने चालू शकते. यास पोलीस सेवाही अपवाद नसल्याचे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, विद्यासन एज्युकेशनल ट्रस्टचे डॉ. राजीव धामणकर, डॉ. रिटा धामणकर, महेश चव्हाण, संतोष वझे यांच्यासह अलिबाग तालुक्यातील शाळेतील विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## ज्येष्ठ नागरिकांनी मालमत्तेचे संरक्षण करावे, इच्छापत्र करावे –निर्मला सामंत प्रभावळकर

**अलिबाग : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या मालमत्तेचे संरक्षण करावे. शक्यतो बक्षीस पत्र जिवंत पणी करून नये व इच्छापत्र करावे कारण त्याची अंमलबजावणी मृत्यू पश्चात होते व त्याना त्यांच्या स्थावर व अस्थावर मालमत्तेतून कोणीही बेदखल करू शकत नाहीत,असे मौलिक मार्गदर्शन मुंबईच्या माजी महापौर निर्मला सामंत प्रभावळकर यांनी अलिबाग मध्ये एका कार्यक्रमात बोलताना केले.

अलिबाग येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय (भारत सरकार ) व सीएसएससी रिजनल रिसोर्स सेंटर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने एक जनजागृती कार्यक्रम सँडी कॉटेज येथील सभागृहात आयोजीत करण्यात आला होता. त्यास नागरिकांनी खूप चांगला प्रतिसाद दिला . कार्यक्रमात अॅड.



निर्मला सामंत प्रभावळकर यांचे ज्येष्ठ नागरिक व त्यांच्या मालमत्येचे संरक्षण व त्याच्या साठी असलेल्या कायद्या विषयी मार्गदर्शन झाले . त्यानी अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष पंढरीनाथ राऊत व चारुशीला कोरडे यांचा सत्कार केला व ते बंधात असलेल्या वृद्धाश्रमाची पूर्तता होण्यास सरकारी पातळी वरच्या अडचणी असल्यास त्या दूर करण्यास मदत करतील असे आश्वासन दिले.

या जनजागृती शिबिरात कायदे विषयक मार्गदर्शना बरोबरच इतर विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. अलिबाग मधील प्रसिद्ध विधिज्ञ अॅड जयंत चेऊलकर यांनी सायबर क्राईम या विषयावर मार्गदर्शन केले. साइबर फ्रॉड गुन्हे वाढत आहेत म्हणून अमिषाला बळी पडू नये व कोणती खबरदारी आपण गुन्हे टाळण्यासाठी घेतली पाहिजे यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

आयुष्य जगताना काही महत्त्वाच्या बाबीं खूप महत्त्वाच्या असतात त्या विषयी तिसऱ्या सत्रामध्ये आयुष मंत्रालय यांचे अधिकृत प्रशिक्षक समरेश शेळके यांनी आपले विचार मांडले अमिषा भगत योग प्रशिक्षक यांनी योगाचे शरीराला व मनाला होणारे फायदे याचे महत्त्व सांगितले व प्रत्यक्ष काही आसनांचं प्रात्यक्षिक दाखविले.

## स्वच्छ सर्वेक्षणातील सुपर स्वच्छ लीग विशेष कॅटेगरीत नवी मुंबईचा समावेश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये सातत्याने आपले मानांकन उंचावणारे शहर म्हणून नवी मुंबई शहर नावाजले जाते. 'स्वच्छ सर्वेक्षण २०२३' मध्येही देशातील व्दितीय क्रमांकाचे (तांत्रिकदृष्ट्या तृतीय) स्वच्छ शहर म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेस मानांकन लाभले आहे. त्याचप्रमाणे कचरामुक्त शहराचे सर्वोच्च 'सेव्हन स्टार' रेटिंग आणि ओडीएफ कॅटेगरीमध्ये सर्वोच्च 'वॉटर प्लस' रेटिंग देखील नवी मुंबई महानगरपालिकेने प्राप्त केलेले आहे.

या अनुषंगाने 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' चे टूलकिट प्रकाशित करताना शहरी विकास मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' करिता आजवरच्या स्वच्छ सर्वेक्षणात सातत्याने अग्रक्रमावर राहिलेल्या उच्चत्तम शहरांकरिता 'सुपर स्वच्छ लीग' ही नवीन विशेष कॅटेगरी निर्माण करीत असल्याची घोषणा केली. यामध्ये लोकसंख्येच्या आधारावर शहरांच्या पाच श्रेणी निवडण्यात आल्या. त्यामधील दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येच्या देशातील प्रमुख शहरांच्या मुख्य गटात ३ शहरांचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये नवी मुंबई हे महाराष्ट्रातील एकमेव शहर आहे.

या 'सुपर स्वच्छ लीग' गटामध्ये महाराष्ट्रातील नवी मुंबई, मध्य प्रदेशातील इंदोर आणि गुजरातमधील सुरत या तीन शहरांचा समावेश आहे. या तीन शहरांनी सातत्याने स्वच्छतेमध्ये अग्रक्रम राखला असून त्यांची स्वतंत्र कॅटेगरी निर्माण करण्यात आली आहे. नवी मुंबईकर नागरिकांच्या दृष्टीने ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट असून या यशस्वी मानांकनाबद्दल महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व नागरिकांचे अभिनंदन केले आहे.

नवी मुंबईचा स्वच्छ सर्वेक्षणातील 'सुपर स्वच्छ लीग' या नव्याने निर्माण केलेल्या विशेष गटात समावेश होणे ही आनंदाची गोष्ट आहेच, त्यासोबतच आपल्या सर्वांची जबाबदारी वाढवणारी बाब असून यापुढील काळात आपले स्थान उंचावत ठेवण्यासाठी सर्व नागरिकांचा शहर स्वच्छतेत अधिक आत्मियतेने व सक्रियतेने सहभाग आवश्यक असल्याचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले आहे.

नवी मुंबईकर नागरिक नेहमीच स्वच्छता कार्यात अग्रेसर राहिले असून येथील स्वच्छतेबाबत वेळोवेळी दाखवलेली जागरूकता शहराच्या नावलौकिकात भर घालणारी राहिली आहे. त्यामुळे 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष गटात समावेश झाल्यानंतर अधिक जागरुकतेने स्वच्छता वाढीवर भर देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सुपर लीगमध्ये समावेश झाल्याने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये गुणांकनाचे स्वरुप बदलले असून आता १० हजार गुणांचे मूल्यमापन आहे. त्या गुणांच्या वर्गवारीमध्ये प्रत्यक्ष दर्शनी स्वच्छतेला १५०० गुण, घन कच–यावरील शास्त्रोक्त प्रक्रियेकरिता १५०० गुण तसेच जनजागृती उपक्रमांकरिता १५०० गुण असणार आहेत. त्याचप्रमाणे वर्गीकृत कचरा संकलनाकरिता १००० गुण, शौचालय व्यवस्थापना करिता १००० गुण, सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पुनर्उपयोगाकरिता १००० गुण व माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन कचरा व्यवस्थापन सुधारणेकरिता १००० गुण असणार आहेत. तसेच लोकांकडून प्राप्त तक्रार निवारणासाठी ५०० गुण, मलनि:स्सारण प्रक्रियेकरिता ५०० गुण आणि स्वच्छताकर्मीकरिता कल्याणकारी कामांसाठी ५०० गुण अशाप्रकारे एकूण १०,००० गुणांनुसार सर्वेक्षण केले जाणार आहे. याशिवाय कचरामुक्त शहर मानांकनाकरिता २५०० गुण व ओडीएफ वॉटर प्लस मानांकनाकरिता २५०० गुण ग्राह्य धरले जाणार आहे.

या सर्वेक्षणामध्ये शालेय स्वच्छतेवर विशेष लक्ष दिले जाणार असून स्वच्छ आणि कचरामुक्त शाळा, शाळांमधील कचरा वर्गीकरण आणि कंपोस्ट पीट्सचा वापर, विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व्यवस्था अशा विविध बाबींची बारकाईने पाहणी करण्यात येणार आहे.

शहरातील पर्यटन स्थळे, स्मारके व परिसर स्वच्छता या बाबीही महत्वाच्या आहेत. शहर स्वच्छतेविषयी नागरिकांच्या अभिप्रायाकरिता विविध माध्यमांचा वापर केला जाणार असून प्रत्यक्ष 'संवाद, स्वच्छता प, माय गर्व्हमेंट प, वोट फॉर माय सिटी प आणि वोट फॉर माय सिटी पोर्टल' अशी ५ माध्यमे सर्वेक्षणातील नागरिक प्रतिसादाकरिता १५ फेब्रुवारी नंतर उपयोगात आणली जाणार आहे.

या अनुषंगाने सर्व अधिकारी, कर्मचारीवृंद यांनी 'निश्चय केला, नंबर पहिला' हे ध्येय साध्य करण्यासाठी संपूर्ण क्षमतेने सक्रिय व्हावे असे सूचित करीत स्वच्छ सर्वेक्षणातील सुपरस्वच्छ लीग मधील आपला प्रवेश ही आपल्या आजवरच्या कार्याची पोचपावती असून हे मानांकन उंचावण्यासाठी नियोजनबध्द कृती आराखडयानुसार आपल्याला सोपविलेल्या जबाबदारीनुसार मुद्देनिहाय काम करावे असे आढावा बैठक घेत निर्देश दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार, शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड व सर्व विभागप्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

स्वच्छतेमधील नवी मुंबईच्या आजवरच्या मानांकनात नवी मुंबईतील लोकप्रतिनिधी, विविध संस्था, संघटना, मंडळे, शाळा – महाविद्यालये, ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, दिव्यांग, तृतीयपंथी नागरिक तसेच प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी व सर्वच नागरिक अशा विविध समाज घटकांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. दैनंदिन शहर स्वच्छ ठेवणारे स्वच्छतामित्र व स्वच्छतासखी तसेच सफाईमित्र यांचे सर्वाधिक योगदान या मानांकनात आहे. यापुढील काळात शहराचे मानांकन उंचावण्यासाठी अधिक जोमाने काम करूया असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केले आहे.

पान १ वरून

## सामान्य जनतेचे प्रश्न मार्गी लावणार

आदिवासी भागात विकास करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांनी सहकार्य करावे, अशी विनंती त्यांनी या वेळी केली तसेच पक्षात येणारा प्रत्येक कार्यकर्ता सारखाच असेल. जुना–नवा भेदभाव केला जाणार नाही, असेही स्पष्ट केले.

सोहळ्यास भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, ज्येष्ठ नेते विनोद भोईर, अभिजित देशमुख, सागर ओसवाल, चौक सरपंच रितू ठोंबरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वनमंत्री गणेश नाईक यांचा सत्कार सुधीर ठोंबरे यांनी, तर प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा सत्कार चौक सरपंच रितू ठोंबरे यांनी केला. सर्व मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे यांनी केले.

या वेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, वावर्ले ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजू मोरे, लोधिवली थेट सरपंच पूजा तवले, चौक पंचायत समिती विभाग प्रमुख जगदीश हातमोडे, उपसरपंच राजन गावडे, अक्षय म्हामुणकर, युवासेना उपतालुकाप्रमुख नितीन तवले, ग्रामपंचायत सदस्य रेखा भुईकोट, सुभाष शिंदे, सुरेखा मोरे, शाखाप्रमुख सुनील गायकवाड, चौकचे माजी उपसरपंच सचिन मते, एकनाथ मते, ग्रामपंचायत सदस्य पूजा हातमोडे, नयना झिंगे, वावंढळ उपसरपंच अमोल कदम, अजिंक्य देशमुख, शरद पिंगळे, बाळू ठाकूर, माजी उपसरपंच हरिश्चंद्र भोसले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते १३०० जणांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले. या पक्षप्रवेशामुळे चौक विभागात भाजप अधिक मजबूत झाला आहे.

## चरी येथे शेतकरी संपाचे भव्य स्मारक उभारणार

चरी येथे स्मारक उभारण्यासाठी तेथे पुरेशी जागा नाही. अलिबाग–पेण मार्गावर एमएमआरडीएची जागा आहे. त्यातील एक एकर जागा घेऊन या जागेत चरी शेतकरी आंदोलनाचे स्मारक बांधण्याचा विचार आहे. त्यासाठी एक कोटी रुपये पुरेसे नाहीत. या स्मारकासाठी पाच कोटी रुपये द्यावेत, असे पत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपण देणार असल्याचे ना. आठवले यांनी सांगितले.

अनुसूचित जाती–जमाती अन्याय प्रतिबंधक कायद्यान्वये जी प्रकरणे न्यायालयात आहेत त्यांचा निकाल लवकर लागावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन मिळावे यासाठी आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना दोन लाख ५० हजार रुपये दिले जातात. तो निधी तत्काळ मिळावा यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. अलिबाग येथील सामाजिक न्यायभवन दुरूस्तीबाबत मी स्वतः जातीने लक्ष घालणार आहे, असे मंत्रीमहोदयांनी नमूद केले.

काँग्रेसने आम्हाला भूलथापा दिल्या, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्मारके बांधली. सामाजिक एकोपा निर्माण केला. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली आपल्या देशाचा विकास झपाट्याने होत आहे. पंतप्रधानांचा विचार विकासाचा आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्याबरोबर आहोत, असे ना. आठवले म्हणाले.

## दिशा समितीची आढावा बैठक; लोकप्रतिनिधींची उपस्थिती

लोकहिताची विकास कामे करताना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अधिक सजग रहावे. सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करण्यावर भर द्यावा. या योजनासंदर्भातील उदासिनता दूर करून प्रभावीपणे योजना राबवावी. जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या कामांची तपासणी करावी, त्यांचा आढावा घेण्यात यावा तसेच पूर्ण झालेल्या योजनांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत सुरू आहे का याची खातरजमा करावी, असेही खासदार बारणे यांनी या वेळी सांगितले.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतर्गत जिल्ह्याला मंजूर असलेल्या रस्त्यांच्या कामाकडे संबंधित यंत्रणा यांनी प्राधान्याने लक्ष द्यावे तसेच कामे प्रस्तावित करताना लोकप्रतिनिधींशी चर्चा करावी. या कामांमध्ये विनाकारण दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांवर ब्लॅंक लिस्ट करण्याची कारवाई करावी, असे निर्देश खासदार तटकरे यांनी दिले. दिव्यांग बांधवांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचा लाभ १०० टक्के देण्यासाठी गाव पातळीवर शिबिरे घेण्यात यावीत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.


सरकारी लाभाच्या योजना अनुदान उपलब्ध करून देताना ज्या बँका मागील वसुली करत असतील त्या बँकावर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश खासदार तटकरे यांनी या वेळी संबंधितांना दिले. जिल्ह्यातील बँकाच्या कार्यपद्धतीवर त्यांनी नाराजी व्यक्त केली. कृषी कर्जाचे प्रमाण जिल्ह्यात नगण्य आहे तसेच बँकामार्फत अनेक प्रकरणे नामंजूर केली जातात. तेव्हा बँकानी एकाचवेळी कागदपत्रे पूर्तता करून घ्यावी तसेच नामंजूर प्रकरणाची फेरतपासणी करून मदतीचे धोरण स्वीकारावे, असेही त्यांनी सूचित केले.

बैठकीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय सामाजिक मदत कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) (महानगरपालिका, नगरपालिका), स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), जल जीवन मिशन, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, डिजिटल इंडिया भूमी अभिलेख नूतनीकरण कार्यक्रम, अटल मिशन फॉर रिज्युव्हेशन ॲण्ड अर्बन ट्रान्सफॉरमेशन, प्रधानमंत्री फसल बीमा योजना (भात व नाचणी), पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना, राष्ट्रीय आरोग्य योजना, समग्र शिक्षा अभियान, एकात्मिक बाल विकास योजना, मिड–डे मिल योजना (प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना) या योजनांचा आढावा घेण्यात आला. प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी प्रास्ताविक केले.

### दुखवटा

## वासंती सकपाळ

**नवी मुंबई** : पुनर्वसन सामाजिक संस्थेचे सदस्य आणि सामाजिक कार्यकर्ते प्रदिपकुमार सकपाळ यांच्या मातोश्री कालकथित वासंती भागुराम सकपाळ यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मृत्यूपश्चात पती, चार मुलगे, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे.सिवूड्स करावे येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय

# ट्रम्पशाहीची सुरुवात

अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील विजयी उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे ४७वे अध्यक्ष म्हणून सोमवारी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर त्यांनी केलेले पहिले अध्यक्षीय भाषण ज्यांनी कुणी ऐकले असेल त्यांना ट्रम्प यांच्या या दुसऱ्या सत्ताकालखंडातील बदलांना निव्वळ अमेरिकेलाच नव्हे तर अवघ्या जगालाच सामोरे जावे लागणार आहे याचा अंदाज आलाच असेल.

**'अमेरिकेचे सुवर्णयुग या क्षणापासून सुरू झाले आहे' या शब्दांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या भाषणाची सुरूवात केली खरी, पण इथून पुढे त्यांचे अनेक निर्णय हे इतर देशांकरिता समृद्धीची वाटचाल बिकट करणारे असू शकतील याची झलक या भाषणात स्पष्टपणे दिसून आली. 'मी केवळ अमेरिकेला सर्वाधिक प्राधान्य देईन' असे स्पष्ट प्रतिपादन करणाऱ्या ट्रम्प यांनी आपल्याला कर आणि शुल्कांचा अवलंब करून अन्य देशांतून अमेरिकेत पैसा आणायचा आहे असेही नि:संदिग्धपणे सांगून टाकले. त्यांची धोरणे अमेरिकाकेंद्री असणार आहेत हे अपेक्षितच होते. त्यामुळेच राष्ट्राध्यक्षपदी ट्रम्प पुन्हा आल्यानंतर होणाऱ्या बदलांना अवघ्या जगाला सामोरे जावे लागणार आहे याची खूणगाठ सारेच देश बाळगून आहेत. चार वर्षांच्या खंडानंतर पुन्हा अध्यक्षपदी परतलेल्या ट्रम्प यांनी ऊर्जा क्षेत्र, जगभरातून अमेरिकेत येणारे स्थलांतरित व व्यापार व करप्रणाली आदी संदर्भातील मोठ्या बदलांविषयीचे सूतोवाच केले. अमेरिकेच्या दक्षिण सीमेवर आणीबाणी घोषित करण्यात येत असल्याचे तसेच तेथून अमेरिकेत होणारी घुसखोरी रोखण्यासाठी लष्कर पाठवले जाईल असेही त्यांनी जाहीर केले. बेकायदा स्थलांतरितांविरोधात ट्रम्प कठोर कारवाईचे पाऊल उचलणार हे अपेक्षितच होते. या पहिल्यावहिल्या अध्यक्षीय भाषणातील ट्रम्प यांचा अभिनिवेश पाहण्यासारखा होता. आपल्या शपथविधीच्या या क्षणापासून अमेरिकेचा सुवर्णकाळ सुरू होतो आहे. अमेरिकेचे अध:पतन या क्षणापासून थांबले आहे अशी वाक्ये त्यांनी बिनधास्तपणाने व आवेशाने उच्चारली व २० जानेवारी हा दिवस अमेरिकेत 'लिबरेशन डे' अर्थात मुक्ती दिवस म्हणून जाहीर केला. अमेरिकेच्या हितसंबंधांच्या आड येणाऱ्या कोणत्याही गोष्टीचा मुलाहिजा आपण ठेवणार नाही हे स्पष्टपणे सांगताना त्यांनी कोणताही आडपडदा ठेवला नाही. हीच त्यांची शैली आहे. त्यांनी अमेरिकेत राष्ट्रीय ऊर्जा आपत्कालीन स्थिती जाहीर केली. इंधनाच्या किंमती वाढल्यामुळे महागाई वाढल्याचे सांगत, आपल्या 'ड्रिल बेबी ड्रिल' या घोषणेचा त्यांनी पुनरुच्चार केला व यापुढे अमेरिका अधिकाधिक तेल व वायूचे उत्खनन करणार असल्याचे स्पष्ट केले. याआधीच्या बायडेन प्रशासनावर त्यांनी बिनदिक्कत टीका केली. आधीच्या राजवटीने आपल्या देशात बेकायदा प्रवेश करणाऱ्यांना संरक्षण आणि अभय दिले असा आरोप करीत अशा लाखो गुन्हेगारांना आपण ते जिथून आले तिथे परत पाठवणार आहोत हे ट्रम्प यांनी स्पष्ट केले. बेकायदा गुन्हेगारी टोळ्यांना आता अमेरिकेत परदेशी दहशतवादी संघटना म्हणून घोषित करत असल्याचेही त्यांनी सांगितले. अमेरिकेच्या नागरिकांना श्रीमंत करण्यासाठी आम्ही इतर देशांवर आयातशुल्क आणि कर लादणार आहोत. त्यासाठी बाह्य महसूल सेवा विभाग स्थापन केला जाईल. यामुळे परदेशातून अमेरिकेत मोठ्या प्रमाणात पैसा येईल ही त्यांची घोषणा जगभरातील देशांनी विचारात घेण्यासारखीच आहे. जागतिकीकरणानंतर जगभरातील व्यापाराचे स्वरूप बदलून चीन व भारत यांसारखे देश आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन समोर आले आहेत. अमेरिकेच्या धोरणबदलांनंतरही खुल्या व्यापारसंधी कायम राहतील का हे येणाऱ्या काळातच स्पष्ट होईल.**

# मुख्यमंत्र्यांचा कृती आराखडा, प्रशासनाला मिळतोय शिस्तीचा धडा!

क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवार, दि.०७ जानेवारी २०२५ रोजी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दृक परिषदेद्वारे उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण) एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) अजित पवार व मंत्रिमंडळाच्या उपस्थितीत संबोधित केले.

राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांकरिता आगामी १०० दिवसांमध्ये १) संकेतस्थळ, २) सुकर जीवनमान , ३) स्वच्छता, ४) जनतेच्या तक्रारींचे निवारण, ५) कार्यालयातील सोयी व सुविधा , ६) गुंतवणूक प्रसार, ७) क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या मुद्यांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश या बैठकीत देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी आगामी १०० दिवसांमध्ये कृती आराखड्यानुसार कार्यवाही करावी, असे शासन निर्णयाद्वारे कळविण्यात आले आहे.

सात कलमी कृती आराखड्याविषयी विस्तृत माहिती या लेखाच्या माध्यमातून जाणून घेवू या..

**१. संकेतस्थळ:** सर्व कार्यालयांनी आपल्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवावी. कार्यालयाचे संकेतस्थळ हाताळण्यास सुलभ असावे. संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार जास्तीत जास्त माहितीचे स्वयंप्रकटीकरण करण्यात यावे. वेबसाईटच्या माध्यमातून नागरिकांना सेवा उपलब्ध होईल यादृष्टीने वेबसाईट राहील, हे पहावे. बाबत आवश्यक दक्षता घेण्यात यावी. संकेतस्थळ अद्ययावत ठेवतानाच संकेतस्थळाच्या सुरक्षेबाबत आवश्यक दक्षता घ्यावी. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने च्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे सर्व माहिती अद्ययावत करावी, तसेच विभागांची लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतूदींनुसार सर्व विभागाच्या सेवांबाबतची माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी विभागांना सहकार्य करावे.

**२. सुकर जीवनमान :** नागरिकांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचलित कामकाजाच्या पद्धतींचे पुनर्विलोकन करुन प्रशासकीय कार्यपद्धतीमध्ये किमान दोन सेवा अतिशय सुलभ पध्दतीने द्याव्यात. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरीता सातत्याने प्रयत्न करावेत.

**३. स्वच्छता:** प्रचलित नियम, कार्यपद्धतीप्रमाणे शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये निंदणीकरण, नष्टीकरण व निर्लेखनाची प्रक्रिया प्राधान्याने व निरंतरपणे राबविण्यात यावी. याअंतर्गत कार्यालयांमधील अभिलेख निंदणीकरण करुन तपासाअंती आवश्यक नसल्यास नष्ट करण्यात यावेत. तसेच, सर्व अभिलेखांचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण–२०१८/प्र.क्र.९/१८(र.–व–का.), दिनांक १५.०२.२०१८ अनुसार वर्गीकरण करण्यात यावे. कार्यालयांमधील जुन्या व निरुपयोगी जडवस्तूंची (उदा. संगणक, टेबल, खुर्च्या, कपाटे,



इत्यादी) विहित कार्यपद्धतीने विल्हेवाट लावण्यात यावी. त्याचप्रमाणे कार्यालयांच्या आवारात असणारी (विशेषतः पोलीस विभागाकडील) जुनी व वापरात नसलेली वाहने यांचे विहित पद्धतीने निर्लेखन करण्यात यावे.

**४. जनतेच्या तक्रारींचे निवारण :** नागरिकांकडून कार्यालयास प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे त्वरेने निराकरण करण्यात यावे व दि.१ जानेवारी २०२५ पूर्वीची प्रलंबितता शून्य करावी. सर्व अधिकाऱ्यांनी कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांच्या भेटीसाठी आठवड्यातील दैनंदिन वेळ राखून ठेवावी व तसे फलक कार्यालयामध्ये दर्शनी भागात लावण्यात यावेत. दौऱ्यावर असल्यास अभ्यागतांना भेट देण्यासाठी अन्य अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर लोकशाही दिनाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यात यावी. तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर निवारण करता येतील असे प्रश्न/समस्या तत्परतेने सोडविले गेल्यास नागरिकांना शासनाकडे पाठपुरावा करावा लागणार नाही.

**५. कार्यालयातील सोयी व सुविधा :** कार्यालयांमधील कर्मचारी वर्ग तसेच येणारे अभ्यागत यांच्याकरिता पिण्याच्या पाण्याची योग्य व कायमस्वरुपी व्यवस्था असावी. कर्मचारी आणि अभ्यागत यांच्यासाठी कार्यालय व कार्यालयाच्या आवारातील प्रसाधनगृहे स्वच्छ ठेवण्यात यावीत. तसेच प्रसाधनगृह नादुरूस्त असल्यास आवश्यक ती दुरुस्ती तातडीने करावी. कार्यालयांमध्ये येणाऱ्या अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय असावे. कार्यालयांमध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक असावेत. कार्यालयांमधील वातावरण प्रसन्न व आल्हाददायक राहील याकरिता विशेष प्रयत्न करून कार्यालयाचे व परिसराचे सौंदर्यीकरण करण्यात यावे. याकरिता आवश्यकतेनुसार जिल्हा नियोजन समितीकडील निधीमधून खर्च करण्यात यावा.

**६. गुंतवणुकीस प्रोत्साहन :** राज्यामध्ये औद्योगिक धोरण राबविताना विविध ठिकाणांवरुन येणाऱ्या गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि गुंतवणूक वाढावी याकरिता सामूहिक प्रयत्न करण्यात यावेत. व्यापारी वर्गाच्या संघटनांशी चर्चा करुन त्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करावा. गुंतवणूकदार उद्योजकांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण तसेच कायदा व सुव्यवस्था या बाबींची प्रभावीपणे हाताळणी करण्यात यावी.

**७. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी:** आठवड्यातून किमान दोन दिवस अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देवून पाहणी करावी. केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्त्वाच्या कार्यक्रम / प्रकल्पांना प्रत्यक्ष भेटी देवून त्यांच्या अंमलबजावणी व प्रगतीची पाहणी करुन त्याचे पर्यवेक्षण करावे. क्षेत्रीय भेटीदरम्यान महत्त्वाचे घटक असणाऱ्या ग्राम पंचायत, शाळा, अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देवून त्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवावी. ग्रामस्तरावरील कर्मचाऱ्यांचे अनुभव, त्यांना येणाऱ्या अडचणी व त्यांनी मांडलेल्या सूचना गांभीर्याने घेवून त्यावर तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

हा १०० दिवसांचा ७ कलमी कृती आराखडा दि.१५ एप्रिल २०२५ पर्यंत यशस्वीपणे राबवून त्याचा अहवाल आपल्या वरिष्ठांना दि.२० एप्रिल २०२५पर्यंत सादर करावा, असे शासनाच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी कळविले आहे.

ठाणे जिल्ह्यातील प्रशासनही जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, सर्व महानगरपालिका आयुक्त, सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांच्यासह सर्व शासकीय–निमशासकीय विभागांचे विभाग/कार्यालयप्रमुख, कर्मचारी यांनीदेखील या सप्तसूत्रीची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाच्या या कृतीशील प्रयत्नांचे ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी स्वागत केले आहे.

**– मनोज सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे**

## बदलते तंत्रज्ञान

# ७५ हजारांमध्ये लाँच झाली नवीन होंडा डियो

होंडा मोटरसायकल अँड स्कूटर्सने नवीन वर्षामध्ये जोरदार सुरुवात करत त्यांची लोकप्रिय होंडा डियो स्कुटरचा अपडेटेड व्हर्जन लाँच केला आहे. या स्कुटरला दोन व्हेरिअंटमध्ये मार्केटमध्ये आणले आहे. पहिला व्हेरिअंट एसटीडी (ढ्ढऊ) आणि दुसरा व्हेरिअंट डिएलएक्स (ऊ्ढ्द) आहे




होंडा डियो की बुकींग १४ जानेवारीपासून देशभरात अधिकृतरित्या होंडा डिलरशिपवर सुरू करण्यात आली आहे. या महिन्याच्या शेवटी डिलिव्हरी सुरू करू होऊ शकते. डियोचे नवीन अपडेटेड लूक आणि मॅकेनिकल लूक खूप आकर्षित आहे. तसेच या अपडेटेड लूकसह काही फीचर्सचा सुद्धा समावेश करण्यात आला आहे.

या नवीन होंडा डियो अपडेटेड मॉडेलच्या लाँचवर होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया चे विक्री आणि विपणन संचालक योगेश माथुर यांनी सांगितले, होंडामध्ये, आमच्या ग्राहकांचे आयुष्य वाढवणारे मोबिलिटी सोल्यूशन्स प्रदान करण्याचे आमचे ध्येय आहे.

डिओ २०२५ नावीन्य, शैली आणि तंत्रज्ञानाच्या परिपूर्ण मिश्रणाचे प्रतिनिधित्व करते. याचे जइऊ२इ– स्वरुप इंजिन फक्त केवळ मानदंडांची पूर्तता करत नाही तर त्याचबरोबर इंधन कार्यक्षमता सुद्धा सुधारते.२०२५ साठी, डियोमध्ये फक्त ११०लल सिंगल–सिलेंडर, एअर–कूल्ड इंजिन मिळते जे आता जइऊ२इ स्वरुपाचे आहे जे जुन्या मॉडेल प्रमाणे पावर आउटपुट देते. हे इंजिन ७.८ लह आणि ९.०३ छ्र चा पीक टॉर्क देते. याला उतढ गिअरबॉक्सशी जोडलेले आहे. याचे इंधन कार्यक्षमता सुधारण्यासाठी निष्क्रिय स्टार्ट/स्टॉप सिस्टमसह सुसज्ज आहे.२०२५ डियो मध्ये काही फीचर अपग्रेड आहे जसे की माइलेज इंडिकेटर, ट्रिप मीटर, इको इंडिकेटर आणि डिस्टंस–टू–एम्प्टी सारख्या आवश्यक माहितीसाठी रीडआउटबरोबर एक नवीन ४.२ –इंच ढ्‌ढ्ढ डिजिटल डिस्प्ले, एक णड्ढ उ–टाइप चार्जिंग पोर्ट आणि हॅलोजन हेडलँप आणि टेललँप इत्यादी फीचर सुद्धा आहेत.

डियो पाच रंगामध्ये उपलब्ध– टॉप–स्पेक ऊ्ढ्द ट्रिम मध्ये अलॉय व्हील उपलब्ध आहेत. डिझाइनच्या दृष्टीकोनातून स्कूटरमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. डियो पाच रंगामध्ये उपलब्ध आहे – इंपीरियल रेड मेटॅलिक, पर्ल इग्नियस ब्लॅक, पर्ल इग्नियस ब्लॅक + पर्ल डीप ग्राउंड ग्रे, मॅट मार्वल ब्लू आणि मॅट ॲक्सिस ग्रे मेटॅलिक.

# राजनीतिज्ञ, शिक्षणतज्ज्ञ स्वामी रामानंद तीर्थ



**निमित्त**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाड्याचे मुक्तिदाते अशी त्यांची ओळख आहे, पण ते केवळ मराठवाड्याचेच नव्हे तर ते पूर्ण हैदराबाद संस्थानचे मुक्तिदाते होते. त्यांनी हैदराबाद संस्थान केवळ निजामाच्या जाचातून मुक्तच केलं नाही तर नव्या राज्याची दिशा कशी असावी हेदेखील त्यांनी दाखवून दिलं होतं. त्यांनी अनेक नेते घडवले. गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, आ. कृ. वाघमारे, अनंत भालेराव, दिगंबरराव बिंदू या नेत्यांचं नेतृत्व त्यांनी केलं होतं. इतकंच नव्हे तर भारताचे माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव हे देखील त्यांचेच शिष्य होते.

३ ऑक्टोबर १९०३ला विजापूर जिल्ह्यातील सिंदगी येथे भवानराव खेडगीकर यांच्या घरात व्यंकटेशचा जन्म झाला. पुढे संन्यास घेतल्यावर त्यांचं नाव स्वामी रामानंद तीर्थ झालं. सोलापूर, अंमळनेर आणि पुणे येथे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी समाजासाठी काही करायचं ठरवलं. त्यातूनच ते कामगार नेते ना. म. जोशी यांचे खासगी सचिव बनले पुढे त्यांनी ही नोकरी सोडली आणि हिप्परगा गाठले. तुळजापूर तालुक्यात हिप्परगा येथे अनंतराव कुलकर्णी यांनी एक शाळा काढली होती. पुढे ही शाळा मुक्तिलढ्याचं एक केंद्र बनली.

निजामाच्या काळात उर्दू शाळांव्यतिरिक्त इतर शाळाचालकांना जाचही असे. अशा कठीण परिस्थितीमध्ये स्वामीजींनी अंबाजोगाई येथे योगेश्वरी विद्यालय ही शाळा चालवली. स्वामीजींना मराठी, तेलुगू, कन्नड, उर्दू आणि इंग्रजी या पाच भाषा येत. त्यामुळे त्या–त्या प्रांतातील व्यक्तीला ते आपल्यापैकीच वाटत. हे सर्व करत असताना त्यांच्या डोक्यात स्वातंत्र्याचा विचार घोळत होता, पण त्यासाठी योग्य संधी सापडत नव्हती. १९३७ साली परतूर येथे स्वातंत्र्याची आस असणाऱ्या लोकांचं संमेलन भरलं. या संमेलनाला महाराष्ट्र परिषद असं म्हटलं गेलं. याच ठिकाणी पहिल्यांदा त्यांची ओळख गोविंदभाई श्रॉफ यांच्याशी झाली. दुसऱ्याच वर्षी लातूर येथे महाराष्ट्र परिषदेचं अधिवेशन झालं. त्यामध्ये ते सरचिटणीस झाले. स्वामीजींनी पूर्णवेळ राजकारणात येऊन संघटनेचं काम करावं अशी इच्छा सर्वांनी व्यक्त केली आणि १९३८मध्ये त्यांचा राजकारणात प्रवेश झाला.

देशात काँग्रेसची स्थापना होऊन ५० वर्षं उलटली होती, पण हैदराबाद संस्थानमध्ये काँग्रेसला परवानगी नव्हती. स्टेट काँग्रेसची स्थापना झाली असं घोषित करून सत्याग्रह करू अशी योजना स्वामीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली होती. त्यानुसार स्टेट काँग्रेसची स्थापना झाल्याचं घोषित करण्यात आलं. नेत्यांनी सत्याग्रह केला. एका तुकडीत स्वामीजी देखील होते. या सत्याग्रहानंतर त्यांना अटक झाली आणि त्यांची रवानगी चंचलगुडा तुरुंगात करण्यात आली.

निजामाविरोधात लढण्यासाठी संघटना उभारली आणि पूर्ण संस्थानात तिची पाळंमुळं रूजवली. १९४२ला चले जाव आंदोलन सुरू झालं. या आंदोलनामुळे संपूर्ण देश ढवळून निघाला. हैदराबाद संस्थानदेखील पेटून उठलं. अनेक मोठ्या नेत्यांची धरपकड सुरू झाली. स्वामीजींना पुन्हा अटक झाली आणि त्यांना १९४३ला सोडण्यात आलं. १९७१मध्ये ते आजारी पडले. त्यानंतर त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झालीच नाही. त्यांना अंबाजोगाई येथून हलवण्यात आलं आणि हैदराबाद येथे त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले, पण त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. २२ जानेवारी १९७२ला त्यांचं निधन झालं.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# लसूण सालीसकट खाणे आरोग्यासाठी योग्य

लसूण ही पोषक घटकांचे पॉवरहाऊस आहे, जी आरोग्यदायी फायद्यांसाठी ओळखली जाते. बेंगळुरू येथील एस्टर व्हाईटफील्ड हॉस्पिटलचे सल्लागार व डर्मेटोलॉजिस्ट डॉ. प्रियंका कुरी यांच्या मते, लसूण केवळ एक उत्कृष्ट प्रतिकारशक्ती वाढवणारेच नाही, तर त्वचा स्वच्छ राखण्यासही मदत करते. परंतु, लसणाचे दररोज जास्त प्रमाणात सेवन केल्याने छातीत जळजळ, ॲसिडिटी व श्वासाची सतत दुर्गंधी यांसारखे दुष्परिणाम उदभवू शकतात.



**लसणाची साल खावी का?**

सर्वांगीण आहारतज्ज्ञ वृत्ती श्रीवास्तव यांनी अनेक कारणांमुळे लसणाच्या सालीचे सेवन न करण्याचा सल्ला दिला आहे. लसणाची कळी स्वतःच आरोग्यदायी फायद्यांनी युक्त असते. विशेषत: मुख्यत: त्यातील शक्तिशाली अँटिऑक्सिडंट लिसिनमुळे. हे संयुग लसूण सेवन केल्यावर खूप फायदेशीर बनवते. परंतु, लसणाची साल कागदासारखी, तंतुमय व पचण्यास कठीण असते.

श्रीवास्तव यांनी सालींमध्ये कीटकनाशकांचे अवशेष असल्याबद्दलची माहिती दिली. कांद्याच्या सालींप्रमाणेच लसणाच्या सालीचे सेवन केल्यावर पौष्टिक हेतू साध्य होत नाही. त्यामुळे त्या टाकून देणे चांगले, असे त्या म्हणाल्या.

परंतु, त्यांनी लसणाच्या सालींचा पर्यायी वापर सुचवला. त्यांना फेकून देण्याऐवजी तुम्ही त्यांना रात्रभर पाण्यात उकळू शकता किंवा भिजवू शकता आणि मग ते पाणी बागेसाठी वापरू शकता. त्यातील प्रतिजैविक गुणधर्म वनस्पतींचे कीटक आणि जीवाणूंपासून संरक्षण करण्यास मदत करतात. लसणाच्या सालींमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे व फायटोन्यूट्रिएंट्सदेखील असतात; ज्यामुळे वनस्पतींच्या वाढीला फायदा होतो, असे त्या म्हणाल्या.

**लसणाचे फायदे कसे वाढवायचे?**

आरोग्यदायी फायद्यांसाठी श्रीवास्तव यांनी लसणाच्या पाकळ्या ठेचून चघळण्याची शिफारस केली आहे. लसणामध्ये लिसिन असते. त्यामधील शक्तिशाली अँटी–मायक्रोबियल आणि अँटी–इम्फ्लेमेटरी गुणधर्मामुळे रक्तवाहिन्या विस्तारित होण्यास मदत मिळते आणि ऑक्सिजनचे सेवन सुधारते. विशेषत: प्रदूषित शहरांमध्ये राहणारे लोक, मॅरेथॉन धावपटू, ट्रेकर्स व पर्वतारोहकांसाठी ते फायदेशीर ठरते.

त्यांनी सांगितले की, लसूण कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करण्यात मदत करण्यासाठीही ओळखली जाते. त्यामुळे तो संतुलित आहाराचा एक मौल्यवान भाग आहे. लसणाची साल नेहमीच्या आहारामध्ये वापरासाठी योग्य नसली तरी त्याचा कीटकनाशक म्हणून वापर करता येऊ शकतो.

# माणगाव, रोहा परिसरात दिघी औद्योगिक वसाहत प्रकल्पाची उभारणी -खासदार तटकरे




**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगव रोहा परिसरात दिघी औद्योगिक वसाहत प्रकल्पाची उभारणी केली जाणार आहे. या प्रकल्पासाठी पायाभूत सुविधांसाठी अठराशे कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून फेब्रुवारी महिन्यात प्रकल्पांच्या कामांना सुरवात होणार असल्याची माहिती खासदार सुनील तटकरे यांनी दिली. ते अलिबाग येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

या वेळी माजी आमदार अनिकेत तटकरे, अमित नाईक, हर्षल पाटील, चारूहास मगर आदी उपस्थित होते. कोकणात प्रदूषण विरहीत कारखानदारी यावी यासाठी प्रयत्न सुरू होते. त्याचे सकारात्मक परिणाम आगामी काळात रायगड जिल्ह्यात पहायला मिळतील. वाढवण बंदराच्या धर्तीवर दिघी पोर्ट प्रकल्पाचा विकास केला जाणार आहे. या अंतर्गत माणगाव, तळा आणि परिसरात दिघी औद्योगिक वसाहतीची उभारणी होणार असून फेब्रुवारी महिन्यात प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार आहे अशी माहिती तटकरें यांनी दिली.

या औद्योगिक वसाहतीमध्ये प्रामुख्याने तीन प्रकारच्या उद्योगांचा समावेश असेल यात वाहन उद्योग प्रकल्प, चर्मोद्योग समुह विकास प्रकल्प आणि बल्क ड्रग पार्क प्रकल्पांचा समावेश आहे. चार हजार एकरवर या प्रकल्पाची उभारणी केली जाणार आहे. प्रकल्पासाठी लागणारे पाणी हे कुंडलिका नदीचे पाणी कामत गावातून आणले जाणार आहे. यासाठी १२० दशलक्ष घन मीटर पाणी साठवणक्षमता असलेल्या तलावाच्या निर्मिती केली जाणार आहे. तर प्रकल्पासाठी लागणारा वीज पुरवठा ऐनघर येथील महापरेषणच्या सब स्टेशन मधून होणार आहे. हे सर्व प्रकल्प प्रदुषण विरहीत असतील आणि त्यातून कुठलेही सांडपाणी समुद्रात सोडले जाणार नाही असेही त्यांनी सांगितले.

या औद्योगिक वसाहत प्रामुख्याने कुठले प्रकल्प येणार आहेत. हे लक्षात घेऊन या कुशल कामगार तंत्रज्ञ तयार व्हावेत यासाठी, व्यवसायिक शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी उपयुक्त कोर्से सुरू करण्यासाठी आगामी काळात प्रयत्न केले जाणार असल्याचेही तटकरे यांनी स्पष्ट केले.

# श्रीवर्धन तालुक्यात बॉक्साईड ओव्हरलोड वाहतुकीची समस्या गंभीर, कारवाईची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात विविध अपघातांमध्ये वाढ झाली आहे. शहराच्या मुख्य भागात असलेल्या जसवलीसारख्या गजबजलेल्या ठिकाणी ओव्हरलोड वाहने मोठ्या प्रमाणात येत आहेत, आणि या वाहनांच्या ताब्यात असलेले चालक रस्त्यावर धाडसीपणे वाहन चालवत आहेत. पण वाहतूक नियंत्रित करणारे अधिकारी या वाहने पकडण्यात असमर्थ आहेत, त्यामुळे धोकादायक वाहतूक निःसंकोचपणे चालू आहे.

तालुक्यातील प्रमुख रस्त्यांवर – काळंजी, कुडगाव, मारल, मेघरा, बापवन आणि जसवली – ओव्हरलोड वाहने धोकादायक पद्धतीने धावताना दिसतात. बॉक्साईट डंपर्स आणि ट्रॅक्टरांनी रस्त्यांवर अत्यंत वेगाने वाहतूक केली जात आहे, ज्यामुळे अपघातांच्या वारंवारतेत प्रचंड वाढ झाली आहे. तीन वर्षांपूर्वी काळंजी कुडगाव मार्गे जाणाऱ्या डंपरने एका नागरिकांचा बळी घेतला होता, दोन वर्षांपूर्वी जसवली नाक्यावर एका स्कुटीचा अपघात झाला त्या मध्ये एका महिलेला प्राण गमवावा लागला. तर दोन महिन्यांपूर्वी एका दुचाकीस्वाराला अश्याच एका अवजड वाहतूक धडकेने एका तरुण मुलाला मृत्यूचा सामना करावा लागला.

आरटीओ विभागाच्या कार्यप्रणालीवर नागरिकांकडून अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आरटीओ विभागाच्या कार्यवाहीची गती अत्यंत मंद आहे, त्यांच्यावर गंभीर कारवाई होत नाही.



श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांकडून दबक्या आवाजात ऐकायला येते कि, आरटीओ अधिकारी केवळ मौजमज्ञा करण्यासाठीच येतात आणि ओव्हरलोड वाहनांवर काही ठोस कारवाई केली जात नसल्याने वाहतुकीचे नियम तोडण्याची त्यांना भिती वाटत नाही. पोलिस, आरटीओ आणि महसूल प्रशासनाची कारवाई थातूरमातूर आहे. यातून असा संदेश जातो की, ओव्हरलोड वाहतुकीला शासनाकडून कोणतीही गंभीर दंडात्मक कारवाई होणार नाही. ज्यामुळे वाहतुकीचा नियम उल्लंघन करणे सुरळीत चालू राहते.

राज्य शासनाने मोटार वाहन कायद्याच्या अंतर्गत ओव्हरलोड वाहतुकीवर कठोर पावले उचलावीत, अन्यथा श्रीवर्धन तालुक्यातील रस्त्यांवरील अपघातांची संख्या आणखी वाढू शकते. नागरिकांनी वरिष्ठ प्रशासनाकडून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. यासाठी आरटीओ विभागाला वाहनधारकांना नियमांचे पालन करणे भाग पाडण्यासाठी कठोर दंडात्मक कारवाई आणि तपासणीची गरज आहे.

> **श्रीवर्धन तालुक्यात अवजड बॉक्साईड वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली जाईल. मोटार वाहन सुधारित कायद्यानुसार वजनाच्या मर्यादेपेक्षा जास्त बॉक्साईड वाहतूक केल्यास दंड आकारला जाईल. वाहनचालकांनी दक्षता घेतली पाहिजे.**
>
> **–महेश देवकाते, रायगड जिल्हा प्रादेशिक परिवहन अधिकारी,**

# सामाजिक सभागृहाला लागणारा निधी देणार -मंत्री भरत गोगावले

**माणगाव : प्रतिनिधी**

निजामपूर तळेआळी येथील शासनाच्या पर्यटन विकास मंडळाच्या निधीतून १५ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या सभागृहाचे उद्घाटन रोजगार हमी योजना, फलोत्पादन खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ना. गोगावले यांनी सामाजिक सभागृहाला उर्वरित कामासाठीचा निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही दिली.

निजामपूर तळेआळी येथील सभागृहाचे उद्घाटन मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते रविवार ( दि. १९ ) रोजी करण्यात आले त्यावेळी व्यासपीठावर सरपंच राजाभाऊ रणपिसे, युवसेना उपजिल्हा प्रमुख अविनाश नलावडे, समन्वयक नितीन पवार, सचिव अच्चुत तोंडलेकर, तालुकाप्रमुख राजेश कदम, संपर्क प्रमुख संतोष पोळेकर, विभाग प्रमुख मनोज सावंत, गणेश समेळ, बाळाराम दबडे, हमजाभाई जालगावकर, शहरप्रमुख गणेश पवार, उपशहर प्रमुख नितीन बडे, जेष्ठ सल्लागार मारुती कासार, महिला संघटिका सोनल विचारे, ग्रा. पं. सदस्या अंकिता खेडेकर, राजश्री निजापकर, यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ब्राम्हण समाज, निजामपूर ग्रामपंचायत, व तळेआळी ग्रामस्थांच्या वतीने मंत्री ना. भरत गोगावले यांचा सत्कार करण्यात आला.



## कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत रस्ता सुरक्षा अभियान

**कर्जत : प्रतिनिधी**

जिल्हा वाहतूक शाखा आणि कर्जत पोलीस ठाणे यांच्या वतीने कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे, यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड व वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांच्या मार्गदर्शनानुसार रायगड हॉस्पिटल यांच्या सहकार्याने रिक्षा चालक व इको चालक यांची नेत्र तपासणी करण्यात आली.

कर्जत पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक सुनील चव्हाण, वाहतूक पोलीस कर्मचारी गणेश बोऱ्हाडे, बाबासाहेब तिडके यांनी चारफाटा, श्रीरामपूल, बाजारपेठ आधी ठिकाणी वाहनचालकांना वाहतूक नियमांच्या पत्रकाचे वाटप केले. वाहन चालवताना तोडलेल्या नियमांच्या दंडासंदर्भात माहिती दिली.



# पोस्को महाराष्ट्र स्टीलतर्फे हर्णे आदिवासीवाडी शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

हर्णे आदिवासीवाडी शाळेच्या नवीन इमारतीचे उदघाटन प्रसंगी बोलतांना पोस्को महाराष्ट्र स्टीलचे वरिष्ठ अधिकारी सँग कुग हन यांनी, शाळा केवळ एक इमारत नसून या भागातील विद्यार्थ्यांसाठी नवी संधी आहे, शिक्षणामुळे भविष्य उज्वल होऊ शकते, आणि पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून हे सुनिश्चित केले आहे की, इथल्या प्रत्येक विद्यार्थ्याला शिकण्यासाठी उत्तम सुविधा मिळतील.असे सांगितले

हर्णे आदिवासीवाडी शाळेचा उद्घाटन समारंभ मंगळवार ( दि. २१) रोजी झाला. पोस्को कंपनीचे अधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती, शिरसाड ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, ग्रामस्थ, निजामपूर केंद्र प्रमुख, शिक्षक, विद्यार्थी, पालकवर्ग यांच्या उपस्थितीमध्ये उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात झाला




पोस्को महाराष्ट्र स्टीलने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत या शाळेचे संपूर्ण नव्याने बांधकाम करून विद्यार्थ्यांना नवी आशा आणि संधी उपलब्ध करून दिली आहे. या बांधकामामुळे विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या उज्वल भवितव्याचे नवीन पर्व सुरू झाले आहे. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत करण्यात आलेली ही १२ वी शाळा आहे. शाळेच्या नवीन इमारतीमुळे पटसंख्या वाढेल असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला.

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी शिक्षणासोबतच आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे.

## लोधिवली शिवमंदिरातील मूर्ती चोरली

**खालापूर :** पोलीस ठाणे हद्दीत लोधिवली गावातील शिवमंदीरामधील शिव पिंडावर बसविण्यात आलेली ६,०००/–रुपये किमतीची चांदीची नागाची मूर्ती अज्ञात चोरटयाने १९ जानेवारी रोजी चोरली. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक जुंदरे हे करीत आहेत.


**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

**जाहीर आवाहन**

केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाने दिनांक १७.०९.२०२४ रोजी निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० च्या मार्गदर्शक सूचना व महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांकः प्रआयो–२०२४/प्र. क्र.८७/ गृनिधो–२ दि.१५, ऑक्टोबर, २०२४ अन्वये ''सर्वांसाठी घरे'' संकल्पनेवर आधारित ''प्रधानमंत्री आवास योजनेची (शहरी) – २.०'' अंमलबजावणी होणेकामी कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दितील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, सदर योजनेचा लाभ घेणेकरीता नगरपरिषदेच्या (https://kbmc.gov.in) व केंद्र शासनाच्या (https://pmaymis.gov.in/PMAYMIS2_2024/PmayDefault.aspx) वेब पोर्टल वर इच्छूक लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी.

तसेच, सदर योजने बाबत आवश्यक माहिती करिता नागरिकांनी कुळगाव बदलापुर नगरपरिषद, नवीन प्रशासकीय इमारत, ३रा मजला येथील बांधकाम विभागातील PMAY- शहर स्तरीय तांत्रिक कक्ष येथे संपर्क साधावा.

**सही/–**
**(मारुती गायकवाड)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे वारदोली, ता. पनवेल, जि. रायगड येथील **अनंत भिकू पाटील** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे – वारदोली, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.**

| कब्जेदारांची नावे | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| अनंत भिकू पाटील | १२४ | ४/अ | ०–३८–८०<br>पो.ख. ०–२२–६०<br>०–६१–४०<br>पैकी ०–२२–६० हे.आर.चौ.मी. पो.ख. क्षेत्राचे खरेदीखत | ७.०० |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **२१ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत, असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :– २१/०१/२०२५

**सही/–**
**ॲड विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट & लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat43@gmail.com



राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी


# साई हायस्कूलचे विज्ञान प्रदर्शनात यश; राज्यस्तरावर होणार सहभागी

**माणगाव: बातमीदार**

शाश्वत विकासासाठी विज्ञान या संकल्पनेला आधारभूत मानून विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीला वाव देऊन त्यांच्या अंगी वैज्ञानिक भावना निर्माण करण्यासाठी रा.जि.प.अलिबाग शिक्षण विभाग व रायगड जिल्हा गणित व विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात साई हायस्कूलचे जिल्हा विज्ञान प्रदर्शनात मोठे यश मिळवले



साई विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे लोकमान्य ज्ञानदिप विद्या मंदिर साई,ता.माणगाव, जि.रायगड या शाळेतील इ.१० वी मध्ये शिकणाऱ्या साईराज सुधीर लाड या दिव्यांग विद्यार्थ्यांने मनाली लवलेश जाधव हीच्या सहकार्याने पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन या विषयावर बनवलेल्या प्रतिकृतीला जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक मिळाला आहे. आता हा विद्यार्थी रायगड जिल्ह्याचे नेतृत्व अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी होणार आहे

संस्थेचे अध्यक्ष गजानन अधिकारी, उपाध्यक्ष बळीराम लाड, सचिव गणेश पवार, मुख्याध्यापिका सुजाता म्हात्रे–पाटील, मार्गदर्शक शिक्षक विद्याधर जोशी ,दिलीप देवकर यांच्यासह सर्व शिक्षक –शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी साईराजचे अभिनंदन केले आहे.माणगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट,केंद्र प्रमुख धोंडीराम सुर्यवंशी, अनेक शिक्षणप्रेमी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. साई पंचक्रोशीतूनही साईराज व त्याला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन होत आहे.


**सिडको**
शहरांचे शिल्पकार

**नोटीस-१**

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व १) कमलाकर पांडुरंग देशमुख २) चंद्रशेखर पांडुरंग देशमुख ३) ज्योती प्रकाश मांडे ४) सुरेखा सुरेंद्र पडवळ ५) अलका सीताराम चव्हाण ६) जयश्री सूर्यकांत चव्हाण ७) अमृता अभय पवार ८) विजया चंद्रकांत देशमुख राहणार – रा. पनवेल, ता. पनवेल भूखंड क्र. २६, सेक्टर २८, पुष्पक नोड (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. एलिगंट कन्स्ट्रक्शन्स तर्फे प्रो.पा. विक्रांत विकास रायकर** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३४६७ | २७.१२.२०२४ | पुष्पक नोड | २८ | २६ | १२१० चौ.मी. | ०२.०१.२०२४ | १२.०२.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४११/२०२४-२५

# नवी मुंबईतून महिनाभरात ११८ बांगलादेशी नागरिकांना अटक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील विविध २० पोलीस ठाण्यांमध्ये मागील महिन्याभरात ११८ बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी अटक केली आहे. यामध्ये ५६ महिला आणि ५७ पुरुष आणि पाच बालके आहेत.

संशयित बांगलादेशी नागरिकांनी सादर केलेल्या पुराव्यांची पडताळणी पोलीस अद्यापही संबंधित विभागाकडून करत आहेत. बांगलादेशी नागरिकांच्या अवैध वास्तव्यामुळे राज्य आणि देशावर होणारा परिणाम तसेच वाढत्या गुन्हेगारीमुळे सामान्य नागरिक त्रासले असून बांगलादेशींना पकडून त्यांना त्यांच्या देशात रवानगी करावी, अशी मागणी विधिमंडळात भारतीय जनता पक्षाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. हे बांगलादेशी नागरिक विविध आठवडे बाजारांमध्ये व्यवसाय करत असून अशा अवैध आठवडी बाजारांवर कारवाई करण्याची मागणी केल्यानंतर नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबईतील सर्वच पोलीस ठाण्यांना २१ डिसेंबरपासून बांगलादेशी नागरिकांना अटक करण्याचे आदेश दिले.



सर्वच पोलीस ठाण्यांच्या परिसरात आधारकार्ड, मतदान ओळखपत्र आणि महापालिकांचे जन्मदाखल्यांचे पुराव्यांची तपासणी करुन सूमारे ८०० हून अधिक संशयित बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले. त्यापैकी प्राथमिक चौकशीत ११८ बांगलादेशी नागरिक नवी मुंबईच्या विविध नोडमध्ये राहत असल्याचे उघड झाले. आतापर्यंत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील बांगलादेशी नागरिकांना एका महिन्यात पकडण्यात आलेली सर्वात मोठी संख्या आहे. या कारवाईमध्ये नवी मुंबई पोलीस दलाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचा आणि सर्वच पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा आहे. सर्व पोलिसांनी एकजुटीने तपास केल्यामुळे आतापर्यंत ११८ बांगलादेशी सापडले आहेत. अजूनही शेकडो जणांनी सादर केलेल्या पुराव्यांची छाननी पोलीस करत असल्याची माहिती नवी मुंबईच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक पृथ्वीराज घोरपडे यांनी दिली.

पोलिसांनी अटक केलेल्या बांगलादेशातील नागरिकांपैकी अनेकांनी नवी मुंबईतील महापालिकांच्या जन्मदाखल्यांचे पुरावे पोलिसांना दिले आहेत. फेरीवाला, मजूर काम, घरातील धुणीभांडी, लेडीज सर्व्हिस बार अशा वेगवेगळ्या ठिकाणी ही मंडळी काम करत असल्याचे पोलिसांना आढळले आहे.

### धरपकड सुरूच राहणार

नवी मुंबई पोलीस दलाच्या गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी बांगलादेशी नागरिकांना घर भाड्याने दिल्यास किंवा कामावर ठेवल्यास संबंधित व्यक्तीवर गुन्हा नोंदविण्यात येईल, असे बजावले आहे. अवैध वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची धरपकड अशीच सुरू राहणार आहे.

# सीकेटी कॉलेजमध्ये लोकशाही उत्सव

## विशेष अतिथी सत्र उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अॅड सायन्स कॉलेजच्या राज्यशास्त्र विभाग आणि स्त्री मुक्ती संघटना, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाही उत्सव २०२५च्या औचित्याने मंगळवारी (दि.२१) महाविद्यालयाच्या कॉमर्स अँड मॅनेजमेंट रिसोर्स सेंटरमध्ये आमच्या घरापासून लोकशाही या विषयावर विशेष अतिथी सत्राचे शुभा प्रभूसाटम (प्रसिद्ध, वृत्तपत्र स्तंभलेखिका) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आयोजन करण्यात आले.



प्रास्ताविक मांडत असताना राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी लोकशाहीच्या संकल्पनेचा अर्थ विषद करत विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांच्या संवर्धनात कुटुंबांची अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे उपस्थितांना पटवून दिले. याबरोबरच व्यासपीठावर आसनस्थ मान्यवरांचा परिचय करून दिला.

अतिथी सत्राच्या मुख्य वक्त्या शुभा प्रभुसाटम यांनी कौटुंबिक पातळीवर लोकशाही मूल्यांचे रोपण करण्याबाबत भाष्य करत, स्वातंत्र्य म्हणजे काय? पुरुषप्रधान संस्कृतीमधील मर्यादा अधोरेखित करत त्यावरील उपाययोजना सुचविल्या. त्यानंतर घरात अविरतपणे काम करणाऱ्या माता-भगिनी यांच्या कार्य-कर्तुत्वाबाबत प्रतिपादन केले व समतेच्या संकल्पनेचा खरा अर्थ समजावून सांगितला.

स्त्री मुक्ती संघटनेच्या विश्वस्त समन्वयिका संगीता सराफ यांनी सर्व विद्यार्थ्यांना संबोधित करताना लोकशाही हि संकल्पना मर्यादित किंवा संकुचित नसून ती अधिक व्यापक आणि वस्तुनिष्ठ असे सांगितले. याबरोबरच कुटुंबात सर्व व्यक्तींना समान अधिकार असल्याचे भाष्य केले. लोकशाही मूल्य घरातूनच पाल्यांना देणे महत्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. अपितु लैंगिकता, घरगुती हिंसाचार आदी गोष्टींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बाहेर लोकशाही आणि घरात हुकुमशाही अशी दुटप्पी भूमिका घेऊन चालणार नाही असा संदेश दिला. सरतेशेवटी अतिथी सत्रानंतर प्रश्नोत्तर सत्र होऊन उपस्थित सर्वांनी कौटुंबिक पातळीवर सौहार्दाचे मुक्त वातावरण निर्माण करण्याबाबत शपथ घेतली.

या वेळी व्यासपीठावर शुभा प्रभूसाटम, संगीता सराफ, विश्वस्त समन्वयिका, स्त्री मुक्ती संघटना, अनिता पाटील, सीकेटी महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या प्रमुख तथा अतिथी सत्राच्या अध्यक्षा डॉ. आर. डी. म्हात्रे, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील, आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन समाधान साळवे व ऐश्वर्या तिवारी तर आभार प्रा.आकाश पाटील यांनी मानले.

अतिथी सत्रासाठी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन तथा इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे यांच्या शुभेच्छांसमवेत राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शाळेसमोरील वाहतूक कोंडी हटवा; भाजपची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा सेक्टर ७ मध्ये असलेल्या सेव्हन्थ डे शाळेच्या बाहेरील परिसरात नो पॉर्किंग, वाहतुक कोंडी, अपघात या समस्येचे निवारण करण्यासाठी स्थानिक सानपाडा पोलीस स्टेशन, वाहतुक पोलीस व नवी मुंबई महापालिकेला संयुक्त मोहीम राबविण्याचे निर्देश देवून समस्येचे निवारण करण्याची लेखी मागणी भाजयुमोचे माजी नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष व अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनातून केली आहे.

सेव्हन्थ डे शाळेच्या बाहेर निर्माण झालेल्या समस्येने सानपाडावासिय त्रस्त झाले आहेत. शाळेच्या बाहेर नो पॉर्किंगचे फलक लागलेले असतानाही वाहने बिनधास्तपणे पॉर्किंग केलेली असतात. यामुळे या ठिकाणी वाहतुक कोंडी होते. त्यामुळे स्थानिक वाहतुक पोलिसांनी नो पार्किगच्या ठिकाणी वाहने उभी करणाऱ्या वाहनांवर दररोज कारवाई करणे आवश्यक आहे. केवळ मोबाईलमध्ये फोटो काढून आर्थिक दंड लावून ही समस्या सुटणार नाही. वाहतुक पोलिसांनी दर एक तासांनी येथे टोईंग व्हॅन आणून वाहने उचलून नेल्यास वाहने येथे कोणी उभी करणार नाहीत. शाळा सुटण्याच्या व भरण्याच्या वेळेस या वाहतुक कोंडीचा शालेय विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे पांडुरंग आमले यांनी निवेदनात म्हटले आहे.

या शाळेपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पालिकेच्या उद्यानालगतच्या पदपथावर फेरीवाल्यांचा विळखा पडला असून पदपथावरुन ये-जा करणे स्थानिक रहीवाशांना शक्य होत नाही. येथील फेरीवालेच महापालिका प्रशासनाने कायमस्वरुपी हटविले तर फेरीविक्रेत्यांनी अडविलेला पदपथ स्थानिक जनतेला ये-जा करण्यासाठी खुला होईल व ग्राहकही न आल्याने वाहने उभी राहणार नाहीत. महापालिका प्रशासनाला येथील फेरीवाल्यांवर दररोज कारवाई करण्याचे निर्देश देण्याची मागणी आमले यांनी केली आहे.

सेव्हन्थ डे शाळेसमोरील वाहतुक कोंडीच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेला पदपथावर असलेल्या फेरीवाल्यांवर दररोज कारवाई करण्यास सांगावे. दुपारी व सायंकाळी शाळा सुटण्याच्या वेळेस वाहतुक पोलीस उपलब्ध करून देण्याचे गृहविभागाला निर्देश देण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी केली आहे.

# नेरूळ येथे अखंड हरिनाम सप्ताह

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे यंदाही सलग १८व्या वर्षी संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकोबाराय सेवा मंडळ यांच्या वतीने १२ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी दिंडी पारायण सोहळा हभप गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले बाबा (अध्यक्ष-गाथा मंदिर,श्री क्षेत्र देहू) यांच्या कृपाशिर्वादाने आणि हभप सुभाष महाराज उबाळे यांच्या मार्गदर्शनाने हिंदुहृदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे सभागृह, सेक्टर-१८ नवी मुंबई-नेरूळ येथे भक्तिमय वातावरणात झाला.



या सोहळ्याकरिता आळंदीकर गुणीजन मंडळी आणि महाराष्ट्रातील ख्यातनाम गायनाचार्य आणि मृदुंगमणी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या हरिनाम सप्ताहात हभप कविराज महाराज झावरे, हभप संदिपान महाराज शिंदे, हभप पांडुरंग महाराज घुले, हभप पोपट महाराज पाटील, हभप शिवा महाराज बावस्कर, हभप विलास महाराज गेजगे, हभप सागर महाराज बोराटे आणि काल्याचे किर्तन गुरुवर्य हभप शिवानंद महाराज शास्त्री या महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार महाराजांच्या किर्तनरुपी अमृततुल्य सेवेचा आणि महाप्रसादाचा हजारो वैष्णव भाविकांनी लाभ घेतला.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी भाजप नेरूळ विभाग अध्यक्ष आणि अध्यक्ष राजूशेठ तिकोणे तसेच सप्ताह समितीचे अध्यक्ष भगवान भोर आणि मंडळाचे सर्व सभासद-शुभचिंतक-हितचिंतक नवी मुंबई नेरूळ नगरीतील गुणीजन दानशूर भाविकांनी मोलाचे सहकार्य केले. मंडळाच्या वतीने या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.



# शिरढोणमध्ये भाजप महिला मोर्चातर्फे हळदीकुंकू



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिरढोण येथे भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या वतीने हळदीकुंकू समारंभ सोमवारी (दि.२०) मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात रंगला. या कार्यक्रमाला आमदार महेश बालदी यांच्या पत्नी नीता बालदी आणि उरण नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या हळदीकुंकू समारंभात महिलांसाठी होममिनीस्टर खेळ पैठणीचा आयोजीत करण्यात आला होता. यामध्ये भाविका मुकादम यांनी प्रथम, साक्षी कर्णेकर यांनी द्वितीय तर सुप्रिया भोपी यांनी तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमावेळी भाजप महिला मोर्चाच्या उरण तालुका अध्यक्षा राणी म्हात्रे, पनवेल महपालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, अॅड. वृषाली वाघमारे, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस निशा म्हात्रे, कामगार आघाडीच्या अध्यक्षा समिरा चव्हाण, महिला मंडळाच्या अध्यक्षा रेश्मा भोपी, उपाध्यक्षा रिना ठोकल, सचिव सपना घरत, रसिका वाकडीकर, प्रणिता मुकादम, मानसी खारके, निमीषा मुकादम, जयश्री कर्णेकर, पुनम मुकादम यांच्यासह महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांगांनी केला संक्रांतीचा सण साजरा



**रसायनी : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील गुळसुंदे आणि आपटा या ग्रामीण भागात रविवारी (दि.१९) ब्लाइंड्स युनिटी फॉर सेल्फ सफिशन्सी या संस्थेने अपंगांसोबत संक्रांतीचा सण साजरा केला तसेच महिलांसाठी हळदीकुंकवाचा कार्यक्रमदेखील आयोजित करण्यात आला होता. सणाच्या निमित्ताने दिव्यांगांना संस्थेच्या वतीने ब्लँकेट आणि डब्यांचे वाटप करण्यात आले.

गुळसुंदे येथे झालेल्या कार्यक्रमास सरपंच मिनाक्षी जगताप-पाटील, माजी सरपंच आर.डी.पाटील आणि ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते तसेच आपटा येथेही समाजमंदिरात असाच कार्यक्रम साजरा करण्यात आला. या वेळी एकूण ६० दिव्यांग लाभार्थ्यांना या कार्यक्रमाचा लाभ मिळाला. हा कार्यक्रम ब्लाइंड युनिटी फॉर सेल्फ सफिशियन्सी, नॅश फाउंडेशन आणि एक जरीया अशा तीन संस्थांनी मिळून आयोजित केला होता.

या वेळी Buss संस्थेचे अध्यक्ष राजू वाघमारे, रायगड जिल्हा अध्यक्ष गणेश म्हामणकर व रायगड सचिव किशोर म्हामणकर यांच्यामार्फत हा कार्यक्रम राबविण्यात आला आणि या कार्यक्रमासाठी मिनेश गाडगीळ गुळसुंदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# 'सुवर्णक्रांती'ची कमी वेळेत उतुंग भरारी -सायली म्हात्रे

**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील श्री राजनगर येथे एक वर्षापूर्वी लावलेले सुवर्णक्रांतीचे लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. कमी कालावधीत उतुंग भरारी घेतली आहे. त्याचे श्रेय सुवर्णक्रांतीचे संस्थापक सुखदेव एम. म्हात्रे व त्यांच्या टीमला जाते. चांगली सेवा, उत्तम व्यवस्थापन चांगल्या प्रतीचे व्यवहार त्यामुळेच दिवसेंदिवस प्रगती पथावर सुवर्णक्रांती गेली आहे, असे उरण नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांनी सुवर्णक्रांती अर्बन मल्टीस्टेट निधी लिमिटेडच्या उरण शाखेच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त प्रतिपादन केले.



सुवर्णक्रांती अर्बन मल्टीस्टेट निधी लिमिटेडचे संस्थापक चेअरमन सुखदेव एम.म्हात्रे यांनी सर्व उपस्थित मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व सुवर्णक्रांतीचे सर्व स्टाफ, एजंट, हितचिंतक यांचे स्वागत करून सर्वांचे आभार मानले. सुखदेव म्हात्रे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

या वेळी सुवर्णक्रांती अर्बन मल्टीस्टेट निधी लिमिटेडचे संस्थापक चेअरमन सुखदेव एम.म्हात्रे, उरण नगर परिषद माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उरण पंचायत समिती माजी उपसभापती वैशाली पाटील, निलेश पाटील, डायरेक्टर शितळ पंडागळे, मॅनेजर रोशनी कोळी, हर्ष म्हात्रे, सुवर्णा म्हात्रे, जोत्स्ना म्हात्रे, रोहिणी भोईर, जीवन पाटील, निवृत्ती गडगे, मनीषा भोईर, राम म्हात्रे, शोभा म्हात्रे आदी उपस्थित होते.

सुवर्णक्रांती अर्बन मल्टीस्टेट निधी लिमिटेड मध्ये ठेवी ठेवणाऱ्यांना व्याज १२ टक्के दराने तर जेष्ठ नागरिकांना १३ टक्के व्याज दिला जातो, अशी माहिती सुवर्णक्रांतीचे संस्थापक तथा चेअरमन सुखदेव म्हात्रे यांनी दिली. आलेल्या महिलांना हळदीकुंकू देवून भेट वस्तू देण्यांत आल्या. उल्लेखनीय कामगिरी केलेल्या पाच एजंट यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. आलेल्या सर्वांचे सुवर्णक्रांतीचे संस्थापक तथा चेअरमन सुखदेव म्हात्रे यांनी आभार मानले.

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : नारळ, सुपारीच्या बागांनी भरलेले शहर म्हणजे मुरूड जंजिरा. येथे स्वच्छ, सुंदर समुद्रकिनारा व ताज्या मासळीचा आस्वाद पर्यटकांना आकर्षित करतो. या विहंगम परिसराचे दृष्य टिपले आहे छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी.**

# फोर्टिस हॉस्पिटलमध्ये हळदीकुंकू कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

आपल्या व्यस्त जीवनातून थोडा वेळ काढून वाशीच्या फोर्टिस हॉस्पिटलमधील महिला कर्मचाऱ्यांनी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या वेळी रुग्णालयाच्या व्यवस्थापक प्रीती घेवर, पर्यवेक्षक विक्रांती कदम, संघप्रमुख शीतल ताई, उषा ताई यांच्यासह अनेक महिला कर्मचारी उपस्थित होते. विशेष म्हणजे कोविड-१९ महामारीच्या काळात या महिला कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने रुग्णांची सेवा केली आहे. या संदर्भात त्यांना संसर्ग होण्याची भीती वाटत नाही का, असे विचारले असता ते म्हणाले की, काम आधी येते. ते पूर्ण करणे हे आपले परम कर्तव्य आहे. ज्या रुग्णालयासाठी त्यांना कार्यक्रम आयोजित करण्यास परवानगी देण्यात आली त्या रुग्णालयाच्या व्यवस्थापनाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.



# मुरुड समुद्रकिनाऱ्याजवळील सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड शहराची अहोरात्र नजर ठेवणारा आणि नगर परिषदेने बसवलेले तिसरा डोळा म्हणजे सीसीटीव्ही कॅमेरे या कॅमेरापैकी समुद्रकिनाराजवळ लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे गेले दोन वर्षे बंद अवस्थेत आहेत. प्रशासनाचे याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत.



मुरूड जंजिरा नगर परिषदेच्या वतीने स्थानिक नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षेसाठी ६८ सीसीटीव्ही कॅमेराची यंत्रणा कार्यान्वित झाल्याने चौका चौकातील युवकांची टोळकी, छेडछाड, मारामारी, चोरी असे गैरप्रकार खुपच कमी झाले. तरी ही जर काही गैरप्रकार घडल्यास गुन्हेगार शोधण्यास सीसीटीव्ही कॅमेरे महत्वाची भूमिका बजावत असल्याने पोलिसांना गुन्हेगार शोधण्यास सोपे जाते.

महत्त्वाचे ठिकाण असणाऱ्या समुद्रकिनारा जवळील २२ सीसीटीव्ही कॅमेरे गेले दोन वर्षे बंद अवस्थेत असल्याने पर्यटकांचा व स्थानिकांचा सुरक्षेतेचा प्रश्न ऐरणीवर येऊ शकतो. ही नगर परिषतर्फे हे सीसीटीव्ही कॅमेरे चालु करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.

मुरूड शहर पर्यटन क्षेत्र असल्याने या ठिकाणी रोज शेकडो पर्यटक समुद्रकिनारी ये–जा करित असतात. पर्यटकांची सुरक्षेची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची असल्याने त्वरित बंद अवस्थेत असलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालु करून पर्यटकांना व स्थानिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सर्वंच स्थरावर होत आहे.

### पोलिसांकडून पत्रव्यवहार

**समुद्रकिनाऱ्याजवळील बंद अवस्थेत असलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालु करावे. या संदर्भात पत्रव्यवहार मुरूड पोलीस ठाणे मार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती पोलीस ठाण्यामार्फत सांगण्यात आली आहे.**

## मुळगाव येथे हरिनाम सप्ताह

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील मुळगाव या गावी भैरवी मंदिरात २७ ते ३१ जानेवारी यादरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने नामवंत कीर्तनकार प्रवीणमहाराज शिंदे, ज्ञानेश्वर महाराज वाबळे, अश्विनी म्हात्रे, मनोहर महाराज सायखेडे व माधवमहाराज कर्णूक इत्यादी नामवंत कीर्तनकाराचे व प्रवचनकाराचे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे व माजी शिक्षण सभापती चंद्रकांत शेंडे (शिक्षण मंडळ खोपोली) यांनी दिले. या पाच दिनी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाचे खोपोली व परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलदीपक शेंडे (माजी उपनगराध्यक्ष) यांनी केले आहे.

# बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींची माहिती द्या; रायगड पोलिसांचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

बांगलादेशातील राजकीय अस्थिरता, बांगलादेशातील गरिबी व उपासमारीमुळे बांगलादेशातील नागरिक रोजगाराकरिता सीमेवरील गस्ती पथकाची नजर चुकवून भारतात प्रवेश करतात. अशा अवैधरीत्या भारतात वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची माहिती देण्याचे पोलिसांचे आवाहन रायगड पोलिसांनी केले आहे.

बांगलादेशी शोध मोहिमेदरम्यान महाड एमआयडीसी पोलीस ठाणेचे हद्दीत पिंपळदरी मोरांडेवाडी परिसरात अवैधरीत्या वास्तव्य करणाऱ्या घुसखोर बांगलादेशी पाच पुरुष व एक महिला यांना महाड एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात्त घेऊन कारवाई करण्यात आली. घुसखोर बांगलादेशी नागरिकांकडे कोणतेही वैद्य कागदपत्रे, पासपोर्ट, विजा किंवा भारत सरकारने अथवा भारतीय सीमेवरील नोंदणी अधिकार्याने नेमून दिलेल्या मार्गाव्यतीरिक्त भारत बांगलादेश सीमेवर चोरट्या मार्गाने घुसखोरी करून भारतीय सरहद्दीत प्रवेश करून अनधिकृत वास्तव्य करीत असताना मिळून आले. घुसखोर बांगलादेशी नागरिक हा देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या निगडीत गंभीर प्रश्न आहे.

याबाबत प्रत्येक भारतीय नागरिकाने कर्तव्य भावनेतून पोलिसांना प्रतिसाद देणे गरजेचे आहे. सध्या बांगलादेशातील राजकीय अस्थिरता, बांगलादेशातील गरिबी व उपासमारीमुळे बांगलादेशातील नागरिक रोजगाराकरिता सीमेवरील गस्ती पथकाची नजर चुकवून भारतात प्रवेश करतात. घुसखोर बांगलादेशी नागरिकांचा पेहराव व चेहरेपट्टी हि पश्चिम बंगालच्या सीमावर्ती जिल्ह्यातील नागरीकांसारखी असते त्यांची बोलीभाषा पश्चिम बंगालच्या लोकांपेक्षा थोडया वेगळ्या प्रकारची असते. त्यामुळे ते सीमावर्ती जिल्ह्यातील असल्याचे भासवितात. तरी, औद्योगिक क्षेत्रातील कंत्राटी कामगारांची शहानिशा करून कागदपत्रांची संपूर्ण माहिती पोलीस प्रशासनाला देणे तसेच बाहेरील अनोळखी व्यक्तींना घर भाड्याने देताना रितसर भाडेकरार करून कागदपत्रे पडताळणी करावी.

रायगड पोलीस दलातर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अवैधरीत्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचा माहिती सर्व प्रथम नजीकच्या पोलीस ठाणे अथवा नियंत्रण कक्ष रायगड येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रिस येथे अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पातागंगा परिसरात स्वयंसेवी संस्था हुमना पीपल टू पीपल इंडियाद्वारे प्रकल्प निरामया रसायनी पाताळगंगा हे आरोग्य जनजागृतीवर सक्रियरित्या काम करत आहे.



रसायनी पाताळगंगा परिसरात असंसर्गजन्य रोगांविषयी जास्तीत जास्त जनजागृती व्हावी, म्हणून या परियोजनेमध्ये प्रोजेक्ट लीडर पिंटू कुमार शर्मा हेल्थ एक्सरेटर कुमारी भाई दे तसेच कम्युनिटी मोबिलायझर मनीषा खंडागळे हे कामगिरी बजावत आहेत. महिलांचे ग्रुप बनवून व किशोरवयीन मुलींचे ग्रुप बनवून त्यांना दर महिन्याला आरोग्याविषयी माहिती देणे तसेच मोफत डायबिटीस ब्लड प्रेशर, विनामूल्य तपासणी करणे तसेच मुलींना मासिक पाळीविषयी माहिती देणे, माहिती दिल्यानंतर मोफत सॅनिटरी पॅड वाटप करणे अशाप्रकारे या परियोजनेचे कार्य चालू आहे.

शाळांमध्ये किशोरवयीन मुलींचे अवेअरनेस सेशन घेणे. कम्युनिटी मध्ये जाऊन किशोरवयीन मुलींना ट्रेनिंग देणे, मोफत कॅन्सर स्क्रीनिंगचे शिबिर घेणे अशा पद्धतीने या संस्थेचे कार्य अविरतपणे चालू आहे. उपकेंद्र रिस येथे या संस्थेचे आशा एनएम आणि अंगणवाडी सेविका यांच्यासाठी वर्कशॉप प्रोग्राम घेण्यात आला.त्यात असंसर्गजन्य रोग याविषयी प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणासाठी वासांबे, रिस व मोहोपाडा या भागातील सर्व अंगणवाडी सेविका, आशा सेविका व ANM हजर होत्या. त्यांना रसायनीतील उपकेंद्र रीस येथील डॉ. नयन परब यांनी उत्कृष्ट पद्धतीने प्रशिक्षण दिले.

या प्रशिक्षणासाठी १८ आशासेविका तसेच १० अंगणवाडी सेविका व एन एम आणि डॉक्टर हजर होते. या कार्यक्रमासाठी सर्व आशासेविका आणि अंगणवाडी सेविका यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या प्रशिक्षणाद्वारे जी माहिती दिली गेली त्याद्वारे त्यांनी त्यांचे काम आणखी उत्कृष्टरित्या करावे त्यांना या प्रशिक्षणाचा फायदा व्हावा यासाठी हे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने आशासेविका, एएनएम व अंगणवाडी सेविका हजर होत्या.

# गृहनिर्माण सहकारी संस्था आधुनिक सहकारी क्षेत्रातील आधारस्तंभ -प्रमोद जगताप

**अलिबाग : प्रतिनिधी**

ग्रामीण गृहनिर्माण सहकारी संस्था या आधुनिक सहकार क्षेत्रातील आधारस्तंभ बनत असून त्यांनी सहकारातील अधिकाधिक ज्ञान संपादन करावे आणि आवश्यक त्या नियमाप्रमाणे आपल्या सहकारी संस्था अधिक सक्षम बनवाव्या, असे प्रतिपादन जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप यांनी केले.



चालू वर्ष (२०२५) आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जगभरात साजरे केले जात आहेत. त्या निमित्ताने जिल्हा उपनिबंधक रायगड व सहाय्यक निबंधक पनवेल आणि रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक यांचे संयुक्त विद्यमाने गृहनिर्माण सहकारी संस्थाचे प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापन प्रशिक्षण मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप बोलत होते.

या वेळी जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, अलिबाग सहकारी संस्था सहाय्यक उपनिबंधक श्रीकांत पाटील, पनवेल सहकारी संस्था सहाय्यक उपनिबंधक भारती काटुळे, जिल्हा बँकेचे अधिकारी आणि गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ श्रीप्रसाद परब यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अलिबाग सहकारी संस्था सहाय्यक उपनिबंधक श्रीकांत पाटील यांनी कायद्यामध्ये नव्याने झालेल्या बदलाची माहिती दिली.

रायगड जिल्हा सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. बँकेचे सीनियर मॅनेजर संदीप जगे यांनी बँकेच्या वाटचालीविषयी सादरीकरण केले.

या कार्यशाळेच्या समारोपवेळी संत साहित्य सहकार व मानवी विकास आदी गोष्टींची सांगड घालणारा अवघा रंग एक झाला या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्याते गणेश शिंदे यांनी निरूपण केले तर गायिका सन्मिता शिंदे यांनी त्यांना संगीत साथ दिली.

या वेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना जिल्हा उपनिब्नधक प्रमोद जगताप, अलिबाग सहकारी संस्था सहाय्यक उपनिबंधक श्रीकांत पाटील यांनी दिली. पनवेल सहकारी संस्था सहाय्यक उपनिबंधक भारती काटुळे यांनी गृहनिर्माण संस्थांच्या सहभागाबद्दल आभार व्यक्त करत आपले मनोगत व्यक्त करताना गृहनिर्माण संस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्हा बँकेच्या कळंबोली शाखेच्या शाखाधिकारी सोनल कामाने यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार मानले.

# कराटेपटू शितल गायकवाडचा सन्मान

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथील खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या केएमसी महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षिका, कुमारी शितल गायकवाड यांना दिल्ली येथील महात्मा गांधी ग्लोबल युनिव्हर्सिटी यांच्याकडून स्पोर्ट्स (मार्शल आर्ट) या विषयासंदर्भात डॉक्टर पदवी संसद भवन येथे शाब्बास खान मेरे लुईसा व गवई सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.



शितल गायकवाड यांनी क्रीडा क्षेत्राला वाहून घेतले आहे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थिनींनी कराटे क्षेत्रात नैपूने मिळून यशस्वी ठरल्या आहेत. केएमसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिस्त लावण्याचे काम त्या स्वतः हून करीत आहेत, विद्यार्थिनींना त्यांच्या जीवनात यशस्वी होण्यासाठी त्यांनी कराटेचे प्रशिक्षण देऊन स्वावलंबी केले आहे, त्यासाठी त्या अविवाहित राहिल्या. त्यांच्या सन्मानाबद्दल खोपोली शहरातून त्यांच्यावर अभिनंदनाच्य वर्षाव होत आहे. सामाजिक कार्यकर्ते यशवंत साबळे यांनी त्यांच कौतुक करीत भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# पेणमध्ये रक्तदान शिबिर उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

गरज रक्ताची करू पुरी, शिकवण जगद्गुरुश्रींची जपूनी उरी या दिव्य प्रेरणेतून आणि तुम्ही जगा, दुसऱ्याला जगवा या शिकवणीला अनुसरून जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज संस्थान आयोजित रक्तदान महायज्ञ ४ ते १९ जानेवारी २०२५ या दरम्यान महारक्तदान शिबिर अवघ्या महाराष्ट्रभर राबवले गेले.



उत्तर रायगड जिल्हा पेण तालुका अंतर्गत शरद पवार भवन पेण येथे दालनात महारक्तदान शिबिराचे आयोजन रविवारी (दि.१९) करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भाजप युवा नेते ललित पाटील व माजी नगरसेवक दर्शन बाफना यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या वेळी पेण तालुक्यातील जास्तीत जास्त रक्तदात्यांनी उपस्थित राहून रक्तदान शिबिर यशस्वी करण्यास सहकार्य केले. या वेळी ४३९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिराला पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी उपस्थिती दर्शवून स्वतः रक्तदान ही केले. या रक्तदान शिबिरासाठी मानव संसाधन विकास संस्था रायगड जिल्ह्याचे गंगाधर जोशी, समाधान पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

मुख्य पीठ ब्लड इन नीड प्रमुख आकाश पाटील, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख साहिल म्हात्रे, जिल्हा सह कर्नळ रवींद्र भोईर, पेण तालुका अध्यक्ष किरण म्हात्रे, पेण तालुका सचिव समीर म्हात्रे, पेण युवा अध्यक्ष अनिकेत जोशी, तालुका ब्लड निड प्रमुख प्रणित माळी, ब्लड कॅम्प प्रमुख प्रतीक पाटील, आध्यात्मिक प्रमुख रविंद्र शिंदे, सामाजिक उपक्रम प्रमुख जयवंत घरत, आजी माजी पदाधिकारी व भक्तगण कार्यक्रमाला उपस्थित होते.

# वासांबे ग्रामपंचायत येथे आरोग्य शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वासांबे, येथे रिलायन्स इंडस्ट्री लिमिटेड पाताळगंगाच्या साह्याने आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.

ग्रुप ग्रामपंचायत सरपंच उमा मुंडे व ग्राम विकास अधिकारी वैभव पाटील यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्धघाटन करण्यात आले. या वेळी रिलायन्स इंडस्ट्री पातळगंगाचे डॉक्टर रणजीत खंडारे, मनाली कावळे, बदर पप्पूला व इतर कर्मचारी. या आरोग्य शिबिरात सहभागी होते. शिबिराचा लाभ ४३ जणांनी घेतला. आरोग्य संबधीत विविध चाचण्या या वेळी करण्यात आल्या.



# माणगावमधील आठ गावांतून जाणार पाणलोट यात्रा

**माणगाव : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत माणगाव तालुक्यात पन्हळघर खुर्द, वडगाव, वडवली, कामशेत, नगरोली, निळज, कांदळगाव बु.,करंबेळी, या गावात पाणलोट रथयात्रेचे आयोजन केले आहे. यात्रा ५ ते १० फेब्रुवारीदरम्यान चालणार आहे.



यात प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक नागरिकांना मोबाईल थिएटरद्वारे पाणलोट कामांबाबत आभासी सहलीचा अनुभव येणार आहे. त्याकरीता केंद्र शासनाकडून पाणलोट मोबाईल थिएटर व्हॅन येणार आहे. पाणलोट क्षेत्रात फळबाग लागवड करणे, पाणलोट क्षेत्रावर श्रमदान करणे, पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करणे, कामांचे भूमिपूजन करणे, पाणलोट क्षेत्रात जे काम पूर्ण झाले आहेत ती कामे स्थानिक शाळांना प्रोत्साहन देणे आदी उपक्रम यात्रेच्या माध्यमातून राबवले जाणार आहेत.

पाणलोट यात्रा सुरू होण्याअगोदर तालुक्यात ग्रामसभेचे आयोजन करून समाजमाध्यमांत प्रचार प्रसिद्धी केली जाणार आहे. उत्कृष्ट काम करणाऱ्या पाणलोट समिती सदस्य, कर्मचारी व नागरिकांची पाणलोट योध्दा म्हणून निवड करणार आहे. गावात प्रभात फेरी, शाळांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. पाणलोट यात्रा सुरू होण्यापूर्वी पाणलोट योध्दा व धरणीताईची निवड होणार आहे. पाणलोट यात्रेसाठी जलसंधारण विभाग, वन विभाग व कृषी विभागाने पर्व तयारी सुरू केली आहे.

# फोफरी शाळेतील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**अलिबाग : प्रतिनिधी**

माध्यमिक विद्यामंदिर फोफरीच्या १९८८-८९ च्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी एकत्र येत आपल्या शाळेच्या आठवणी जाग्या केल्या आहेत.



एम व्ही एम फोफेरी इयत्ता दहावीच्या बॅचमधील माजी विद्यार्थी विद्यार्थिनीं यांनी तब्बल ३५ वर्षांनी पुन्हा एकत्र येत धीरज कॉटेज भुवनेश्वर येथे स्नेहसंमेलन साजरा केला. यावर्षी येथे सर्वजण एकत्र आल्या नंतर आपल्या व्यवसाय, कुटुंबावर सविस्तर माहिती दिली. तर बालपणी शाळेत झालेल्या घडामोडींना उजाळा दिला.

सुरुवातीस शाळेतील विद्यार्थी शहीद सुयोग कांबळे यास श्रद्धांजली वाहण्यात आली तदनंतर तन्वी तांडेल, प्रथा पाटील, प्रज्योत नागावकर, तिर्था पाटील, साई मोकल, श्रीयोग पाटील, जान्हवी म्हात्रे या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच उपस्थित सदस्यांचा गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

या वेळी शिक्षक रमाकांत नागावकर, आशाबाई, राजेंद्र नागावकर या शिक्षकांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच ॲड. रत्नाकर पाटील, नरेंद्र मोकल, धनंजय मोकल यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत गावंड व सहकार्य विश्वास मोकल, नितीन मोकल, गणेश म्हात्रे यांनी केले.

या वेळी एकनाथ पाटील, विश्वास ठाकूर, तुकाराम म्हात्रे, संदेश गोठणकर, दिलीप पाटील, रवींद्र म्हात्रे, विलास गावंड, विजय गावंड, रमाकांत म्हात्रे, संतोष पाटील, विजय म्हात्रे, भरत पाटील, विवेक पाटील, नितीन भगत, किरण आचरेकर, नवनाथ पाटील, अंजली तांडेल, संजीवनी म्हात्रे, अंजली केळकर, वैजयंती ठाकूर, प्रार्थना नागावकर, आशा म्हात्रे, लक्ष्मी पाटील, नेहा पाटील, तृप्ती म्हात्रे, पूजा पाटील व इतर सदस्य उपस्थित होते.

# भारतीय महिलांचा सलग दुसरा विजय

## टी-२० वर्ल्डकपमध्ये मलेशियाचा धुव्वा; वैष्णवीची हॅट्ट्रिक




**राजकोट : वृत्तसंस्था**

१९ वर्षांखालील टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील आपल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय महिला संघाने मलेशियाचा १० विकेट्सने पराभव केला. टीम इंडियाने अवघ्या १७ चेंडूत हा सामना जिंकला. मलेशियाचा संघ केवळ ३१ धावांत गारद झाला. त्यानंतर टीम इंडियाने २.५ षटकांत ३२ धावांचे लक्ष्य गाठले. भारताच्या या ऐतिहासिक विजयाची स्टार ठरली वैष्णवी शर्मा, जिने या सामन्यात हॅट्ट्रिक घेत पाच धावांमध्ये चार विकेट्स नावे केल्या.

टीम इंडियाच्या गोलंदाजीसमोर मलेशियन संघाचा डाव पत्त्यांसारखा कोसळला. पॉवरप्लेपर्यंत या संघाने चार विकेट गमावल्या होत्या. जोशिताने मलेशियाला सुरुवातीचा धक्का दिला. यानंतर आयुषी शुक्ला आणि वैष्णवी शर्मा या डावखुऱ्या फिरकीपटूंनी जणू धुमाकूळ घातला. आयुषी आणि वैष्णवीने मिळून १३ धावांत आठ विकेट्स घेतल्या. आयुषीने आठ धावा देत तीन फलंदाजांना माघारी धाडले, तर वैष्णवीने पाच धावा देत पाच विकेट्स घेतल्या. वैष्णवीचा हा पदार्पणाचा सामना होता आणि तिने हॅट्ट्रिकसह कारकिर्दीतील पहिल्या पाच विकेट्स घेत इतिहास घडवला.

वैष्णवी शर्माव्यतिरिक्त आयुषी शुक्लाने तीन विकेट्स, तर जोशिताने एक विकेट घेतली. भारताकडून फलंदाजी करताना गोंगडी त्रिशा आणि जी कमलिनी या सलामीच्या जोडीने एकही विकेट न गमावता आपल्या संघाला २.५ षटकांतच विजय मिळवून दिला. त्रिशाने १२ चेंडूत पाच चौकारांच्या मदतीने २७ धावांची तुफानी खेळी केली. तिने २००पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने धावा केल्या, तर कमलिनी चार धावा करून नाबाद परतली.

टीम इंडियाने १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषकात सलग दुसरा विजय नोंदवला आहे. भारताने वेस्ट इंडिजविरुद्ध पहिला सामना नऊ विकेट्सने जिंकला होता. त्या सामन्यातही भारतीय गोलंदाजांचे वर्चस्व दिसून आले. वेस्ट इंडिजचा संघ अवघ्या ४४ धावांवर गारद झाला आणि त्यानंतर भारतीय संघाने अवघ्या ४.२ षटकांत लक्ष्य गाठले. या सामन्याची मॅचविनर खेळाडू जोशिता ठरली, जिने दोन धावांत पाच विकेट्स घेतल्या होत्या.

आता भारतीय संघाला आपला पुढचा तिसरा सामना २३ जानेवारीला श्रीलंकेविरुद्ध खेळायचा आहे. टीम इंडिया अ गटातून उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरली आहे. श्रीलंकेचा संघही आधीच पात्र ठरला आहे. आता या दोघांमध्ये गटातील टॉपर होण्यासाठी स्पर्धा होणार आहे.

# कोकण विभागीय क्रीडा स्पर्धेत पनवेल महापालिकेचे सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नगर परिषद प्रशासन संचालनालय अंतर्गत कोकण विभाग स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेत पनवेल महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी विविध खेळांमध्ये सहभाग घेत यश प्राप्त केले आहे.

पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे व विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील यांच्या नेतृत्वाखालील क्रिकेट संघाने अंतिम सामन्यात ठाणे जिल्हा संघास पराभूत करून विजेतेपद पटकाविले. या सामन्यात पनवेल महापालिकेचे विश्वास पाटील, प्रतिक पाटील यांचे उत्कृष्ट फलदांजीमध्ये, तर जीवन मेंडे, विशाल म्हात्रे यांचे उत्कृष्ट गोलंदाजीत योगदान लाभले.

याशिवाय पनवेल मनपा अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांनीही विविध खेळांमध्ये यश मिळविले. तीन किमी चालणे प्रथम क्रमांक विनय निकम (यंत्रचालक), द्वितीय संदीप पाटील (उपअग्निशमन अधिकारी), गोळाफेक प्रथम क्रमांक कृष्णा नरवटे (यंत्रचालक), भालाफेक प्रथम क्रमांक संदीप शिंदे (अग्निशामक), लांब उडी प्रथम क्रमांक समाधान आव्हाड, रिले १०० बाय ४ धावणे प्रथम क्रमांक आकाश नलवडे (यंत्रचालक), अमोल जाधव (अग्निशामक), विनय निकम (यंत्रचालक), चेतन बागूल (अग्निशामक), जलतरण प्रथम क्रमांक गौरव राऊत (अग्निशामक); त्याचप्रमाणे कबड्डी टीम द्वितीय, तर हॉलिबॉल टीमने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

अग्निशमन विभागातील महिला कर्मचाऱ्यांनीही विविध खेळांमध्ये यश मिळविले. गोळाफेक प्रथम क्रमांक शुभांगी घुले, द्वितीय पल्लवी जागले, संचिता विचारे, भालाफेक द्वितीय क्रमांक शुभांगी घुले, तृतीय सोनल गेंगजे, लांब उडी तृतीय क्रमांक संचिता विचारे, दोनशे मीटर धावणे तृतीय क्रमांक तेजश्री साळुंखे, चारशे मीटर धावणे द्वितीय क्रमांक सानिध्या पाटील, थाळीफेक द्वितीय क्रमांक शुभांगी घुले, बॅडमिंटन द्वितीय क्रमांक पल्लवी जागले; त्याचप्रमाणे रस्सीखेच स्पर्धेतही अग्निशमन विभागातील महिला कर्मचाऱ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. सर्व यशस्वीतांचे अभिनंदन होत आहे.

# नेमबाज अवनी कोळीला दुहेरी सुवर्णपदक




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिल्ली येथे झालेल्या ६७व्या राष्ट्रीय अजिंक्य डबल ट्रॅप रायफल शॉटगन स्पर्धेत उरण दिघोडे येथील अवनी अलंकार कोळी तसेच राजकुवर इंगळे व स्मिता सावंत यांनी सिनिअर व ज्युनिअर महिला सांघिक डबल ट्रॅप शॉटगन स्पर्धेत दुहेरी सुवर्णपदक जिंकले.

अवनी ही सिद्धांत रायफल अ‍ॅण्ड पिस्टल शूटिंग क्लब रायगडची नेमबाज असून तिने रॅल्स्टन पिटर कोयलो आयसीसीएफ सर्टिफाइड शॉटगन कोच यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे बालेवाडी येथे प्रशिक्षण घेतले आहे.

या यशाबद्दल रायफल क्लबचे अध्यक्ष, सेक्रेटरी किशन खारके, प्रितम पाटील, महेश फुलोरे, अजिंक्य चौधरी, सुनील मढवी, साईम देशमुख, राजू मुंबईकर, अविनाश भगत, समाधान घोपरकर, प्रकाश दिसले तसेच क्लबची शूटिंग रेंज असलेल्या इंडियन मॉडेल स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज उलवे येथील प्राचार्य गौरी शाह, संचालक कोळी, जोशी, दिघोडे आदींनी अवनीचे अभिनंदन केले.

# एसकेपीएलमध्ये पोलादपूर पोलीस संघ विजेता



**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यात शासकीय कर्मचारी प्रीमियर लीग (एसकेपीएल) भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत पोलीस संघाने अंतिम सामन्यात माध्यमिक शिक्षक संघावर मात करीत विजेतेपदाचा करंडक आणि रोख रक्कम नावे केली.

महसूल विभाग, पंचायत समिती सर्व खाते शिक्षण, कृषी, बांधकाम, पाणीपुरवठा, ग्रामसेवक संघटना विभाग, गृह विभाग पोलीस कर्मचारी, कृषी विभाग, वन विभाग, आरोग्य विभाग, माध्यमिक, प्राथमिक शिक्षक, पोस्ट विभाग, महावितरण, एसटी महामंडळ आदी विभागांतील सुमारे १५ संघांनी क्रिकेट स्पर्धेत सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्घाटन तहसीलदार कपिल घोरपडे यांच्या हस्ते, तर पारितोषिक वितरण डॉ. गुलाबराव सोनावणे आणि पत्रकार संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. आरोग्य विभागाने तृतीय आणि एसटी कर्मचारी संघाने चतुर्थ क्रमांकाचा करंडक प्राप्त केला.

पोलीस हवालदार नितेश कोंढाळकर मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज माध्यमिक शिक्षक विजय चौधरी, पोलीस हवालदार शंकर सावंत उत्कृष्ट गोलंदाज, माध्यमिक शिक्षक ऋषिकेश शेप यांना उत्कृष्ट क्षेत्ररक्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

या वेळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक शिंदे व उपनिरीक्षक पवार, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष विजय दरेकर, महसूल शाखेचे आबासाहेब जगताप, वनविभाग बाजीराव पवार, रायगड जिल्हा ग्रामविकास अधिकारी युनियनचे अध्यक्ष अनिल पवार, आरोग्य विभागाचे प्रमोद विरकर आदी उपस्थित होते. स्पर्धेचे थेट प्रक्षेपण युट्युब लाईव्हद्वारे करण्यात आले होते.

# आवास बंदर येथे २८ जानेवारीला बैलगाडी स्पर्धा



**अलिबाग : प्रतिनिधी**

आवास ग्रामस्थांतर्फे भव्य दिव्य बैलगाडी व घोडागाडी शर्यतींचे आयोजन २८ जानेवारी २०२५ रोजी तेथील समुद्र किनारी करण्यात आले आहे.

या शर्यतीचे मुख्य आकर्षण फायनल बैलगाडी गटाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस ट्रॅक्टर, द्वितीय बुलेट गाडी व तृतीय क्रमांक होंडा शाईन गाडी असणार आहे. सेमी फायनल गटात प्रथम क्रमांक होंडा शाईन, द्वितीय स्प्लेंडर व तृतीय टीव्हीएस लुना; क्वार्टर फायनल प्रथम क्रमांक टीव्हीएस लुना, द्वितीय इलेक्ट्रीक सायकल व तृतीय इलेक्ट्रीक सायकल; प्री क्वार्टरफायनल प्रथम क्रमांक व द्वितीय क्रमांक इलेक्ट्रीक सायकल आणि तृतीय क्रमांक गियरवाली सायकल; तर सर्व बैलगाडी गटासाठी प्रथम इलेक्ट्रीक सायकल, द्वितीय व तृतीय क्रमांकास गियरवाली सायकल देऊन गौरविण्यात येणार आहे.

याचबरोबर धावण्याची स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अलिबाग तालुक्यातील खेळाडूंसाठी मर्यादित असून त्यांचे ओळखपत्र म्हणून आधारकार्ड अनिवार्य असणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन आवास ग्रामस्थ मंडळाने केले आहे.



# उरणमधील कराटेपटूंचे यश

**उरण : बातमीदार**

अलिबाग रेवस रोड क्योशी राहुल तावडे यांनी कराटे स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत एकूण ५६० मुलांनी सहभाग घेतला. यामध्ये उरणमधील विजय विकास सामाजिक संस्था ऑल स्टाईल कराटे फेडरेशनच्या एकूण २३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध पदकांना गवसणी घातली.

पदक विजेत्या खेळाडूंचे मास्टर दीपक घरत, विकास भोईर, प्रगती भोईर, अजय तांडेल, सोनल तांडेल, अथर्व घरत यांनी अभिनंदन केले तसेच माजी जि.प. सदस्य तथा विजय विकास सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजय भोईर यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# युनिफाईट स्पर्धेत प्रांजल गायकर, रीतुल म्हात्रे प्रथम

## मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड



**पेण : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या विद्यमान रायगड युनिफाईट असोसिएशन व लक्ष्मी पब्लिक स्कूल सुकापूरने आयोजित केलेल्या रायगड जिल्हा शालेय युनिफाईट स्पर्धेत पेणच्या प्रांजल विजय गायकर आणि रितुल रवींद्र म्हात्रे यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

प्रांजल गायकर पेणमधील सौ.म.ना. नेने कन्या विद्यालयात, तर रितुल म्हात्रे पेण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिकते. या दोघी रवींद्र म्हात्रे व प्राजक्ता तेटमे यांच्याकडे युनिफाईटचे प्रशिक्षण घेतात. जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्यामुळे त्यांची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी रायगडच्या संघात निवड करण्यात आली. त्यांना स्पर्धेसाठी प्रशिक्षक म्हणून रविना म्हात्रे हिने काम पाहिले. प्रांजल आणि रितुल यांचे अभिनंदन करण्यात आले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com